# चल ये, चल ये, चल ये, बयेऽऽ



मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान

# चल ये, चल ये, चल ये, बये !

(बबडी आणि छबडी)

मुरलीधर जावडेकर

मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान, पुणे.

© २०१२.
सर्व हक्क मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठानच्या स्वाधीन.

**लेखक :**
**डॉ. मुरलीधर जावडेकर**
महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, उच्च उत्पन्न गट वसाहत,
इमारत क्र. १, गाळा क्र. ९, संत तुकारामनगर,
पिंपरी, पुणे ४११ ०१८.
दूरध्वनी : ०२०-२७४२१६८३

**अक्षर जुळणी :**
सौ. विनया कुलकर्णी

**मुद्रक :**
**रास प्रिंटर्स,** पिंपरी, पुणे १८.

**प्रकाशक :**
मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान
क्र.: इ ५६४८ पुणे (दि. २१-१-२०११)

**देणगी मूल्य : रू. ४०/-**

**सूचना :** या नाटकातील सर्व पात्रे आणि सर्व प्रसंग संपूर्णपणे काल्पनिक असून कोणास कोठे वास्तवात साम्य दिसल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

ई पुस्तक निर्मिती व वितरण :

## ई साहित्य प्रतिष्ठान

फ़ोन : 9869674820

esahity@gmail.com

पत्ता : जी ११०२, इटर्निटी

तीन हात नाका , ठाणे, ४००६०४

www.esahity.com

ई साहित्य प्रतिष्ठान ही नोंदणीकृत संस्था असून अनेक लेखक वाचकांनी एकत्र येऊन सुरू केली. संस्थेतर्फ़े दर आठवड्याला एक मराठी ई पुस्तक चाळीस देशांतील सुमारे दोन लाख वाचकांना विनामूल्य वितरित केले जाते. त्याशिवाय ई साहित्यच्या विविध वेबसाईट्सना लाखो लोक व्हिजिट करतात.

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व कायदेशीर हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

©esahity Pratishthan® 2013

# चल ये, चल ये, चल ये, बये !

## (बबडी आणि छबडी)

## अंक पहिला

(रंगभूमीच्या पुढील अर्ध्या भागात कथानकातील फ्लॅटची बाहेरील खोली–ड्रॉइंगरूम–असून मागील अर्ध्या भागात बेडरूम आहे. पुढील भागाच्या उजव्या हाताला बाहेरचे दार आहे. आतल्या भागाच्या डाव्या बाजूला स्वयंपाकघर, बाथरूम व उजव्या बाजूला गॅलरी आहे. पुढील खोलीच्या डाव्या बाजूला आतल्या खोलीत जाण्याचं दार आहे. मागील खोली पुढील खोलीपेक्षा थोडी उंचावर आहे. दोन फोन.

काळोख. बाहेरचे दार उघडून एक रसिक गृहस्थ आत येतो. दिवा लावतो. प्रवासाची सूटकेस बाजूला ठेवतो. वय ५०. एक सुंदर स्त्री. अर्थात त्याची पत्नी–वय ४५–आत येते. खांद्यावरील प्रवासी बॅग उतरवते. ती आत येताच तो बाहेरील दार आतून बंद करू लागतो.)

प्रेमला : अहो, नको. बंद नका करू. चार दिवस घर बंद होतं. जरा बाहेरची हवा लागू दे की आतल्या घराला.

प्रभास : प्रेमले, अग फ्लॅट सिस्टिम ही. आपण आत तोंडं धुवायला गेलो की इकडे कुणीतरी घर धुऊन नेलंच.

प्रेमला : तुम्ही बसा ना राखायला. मी शॉवर घेऊन येते. जळ्ळी मेली मुंबईची हवा. आंघोळ केली न केली की घामाची आंघोळ ! त्यात लोकल. चारी बाजूंनी घाणेरड्या माणसांचे धक्के. वर दादर–पुणे बस प्रवास. अखंड धूर. जीव नुसता आंबून तिंबून चिंबून गेलाय. शाम्पू करून स्वच्छ स्नान केल्याशिवाय पाणीसुद्धा पिववणार नाही.

(पुढच्या खोलीला गॅलरीकडे निघणारे दार आहे. ते ती उघडते. हा बाहेरचे दार बंद करतो. ती पुढे येते व समोरची न दिसणारी खिडकी उघडते. तो मागील दार बंद करतो. पुढील खिडकी बंद करायला पुढे येतो. ती बाहेरील दार उघडते. अशीच शिवाशिवी–पळापळ. त्याच वेळी संवाद.)

प्रेमला : हे काय ? उघडं दार बंद केलंत ? शी : शी: शी: !

प्रभास : अग पंखे आहेत ना ! (सुरू करतो.) वा : ! काय मस्त झंझावात आहे ! ये ना ! तुम और मै और तू......

प्रेमला : पंख्याची कसली मेली हवा ? घरात केर साचलाय तोच फिरायला लागेल आपल्या भोवती.

(ती गॅलरीचे दार उघडते. तो बाहेरचे दार बंद करतो. ती समोरची खिडकी उघडायला येते. तो बाहेरील दार बंद करून गॅलरीचे दार बंद करतो.)

प्रभास : अग अग अग...... ती खिडकी नको उघडू.

प्रेमला : पुरुषांना मुळी स्वच्छतेची आवडच नाही.

प्रभास : अग आपल्या रिक्षाचा आवाज ऐकून समोरची रीना तिच्या खिडकीत येऊन बसलीय. ती बघत बसते माझ्याकडे.

प्रेमला : तुम्हाला कसं कळलं ? तुम्हीच बघत असाल तिच्याकडे.

प्रभास : अग जरा तूच बघ माझ्याकडे. मी तुझ्याकडेच बघत बसलोय.

प्रेमला : तिच्याकडे पाठ करा आणि तुम्ही इथं बसा. मी दार उघडते. आता हे बंद केलेलं मला चालणार नाही.

प्रभास : आणि उघडलेलं मला चालणार नाही. तुला कसं काही वाटत नाही ? पंचवीस वर्षं उपास पडलाय मला. लग्न केलं न् लगेचच पाळणा. त्यात जुळं. म्हणजे पुन: चान्सच नाही. त्यात मुली ! दोन्ही मुली ! बबडी न् छबडी ! त्यांच्यापुढे तू माझा सांस्कृतिक दगडी पुतळा उभा करून ठेवलास ! ते काही नाही. आता हा पुतळा जिवंत झालाय. मनुष्य झालाय. पुरुष झालाय. तरूण झालाय.

प्रेमला : बाई बाई बाई ! अहो आता वय का उरलंय ?

प्रभास : मग काय वय झालंय ? तू त्या गॅलरीत केर टाकायला गेलीस तरी समोरचा तरूण दुर्बीण घेऊन ताऱ्यांचं निरीक्षण करताना दिसेल.
('ताऱ्यांचं' म्हणताना तिच्याकडे हात करतो.)

प्रेमला : तुम्ही त्या नटवीवर नजर ठेवून असताच ! जळ्ळी मेली पुरुषांची जात ही. ते काही नाही. सगळी दारंखिडक्या सताड उघडी ठेवा. मी स्वच्छ स्नान करून येते. इथं स्वस्थ बसा.

प्रभास : मी पण येतो ना स्नान करायला. तुला स्वच्छता (स्वत:कडे हात करून) आवडते ना ?

प्रेमला : आधी हवा. मग पाणी. आधी स्वच्छ हवा.

प्रभास : आधी हवा नाही. आधी पाणी नाही. आधी मला उपास सोडायला हवा. पंचवीस वर्षांचा उपास !

प्रेमला : अहो, कशाचं काही ? मुली चांगल्या पंचवीस वर्षांच्या होऊन दोघी दोन दिशांना गेल्या. एक जपानला. एक अमेरिकेला. त्यांना मुलं व्हायची वेळ आलीय अन् तुम्हाला काय हे खूळ लागलंय ?

प्रभास : होय. खूळच लागलंय. प्रेमले, तुझं. आता आधी तुला धरूनच ठेवतो. सोडतच नाही. कध्धीच नाही. कुठं जाशील ? बघ. मला चांगलं पळता येतं. तू कॉलेजात खोखो खेळली असशील. मला नाही तू खो देऊ शकणार. मीसुद्धा मॅरॅथॉनमध्ये भाग घेतलाय. बघ. पळतोय ना मी ? आहे ना ताकद ? म्हातारा नाही झालो. (शिवाशिवी, धावाधावी, पकडापकडी.) पकडली की नाही ? आता कुठं जाशील ? आता काय करशील ? (एका हाताने तिला धरून ओढत) आता सगळी दारं बंद. सगळ्या खिडक्या बंद. सगळे पंखे चालू. बाहेर बंद. आत खुला. खुल्लमखुल्ला.

प्रेमला : आधी तोंड तरी धुऊ द्या. आधी चहा तरी घेऊ द्या. कपडे तरी बदलू द्या. मला माझ्या स्वत:चाच वीट आलाय.

प्रभास : तोंड धुऊ या. चहा घेऊ या. कपडे बदलू या. पण हात नाही सोडू या. मलासुद्धा सगळ्याचा वीट आलाय.

प्रेमला : हात दुखतोय. जरा तरी सोडा.

प्रभास : सगळं सोडू या. पण आधी एकदा.... (तिला बेडरूमकडे ओढतो. तिला धरूनच दार उघडतो. दिवा लावतो. बेडरूम उजळते.) चल. चल. चल. लवकर. थांब. उचलूनच घेतो. असंच करतात तिकडे विलायतेत.

प्रेमला : सगळी तुमची विलायती थेरं.

प्रभास : अग दोन्ही मुली विलायतेतच गेल्यात. (तो उचलू लागतो. इतक्यात फोन !) नको त्या वेळी फोन. काढूनच ठेवतो.

प्रेमला : अहो बबडीचा असेल. जपानहून. पोचली की नाही बघा सुखरूप ? (इतक्यात दुसरा फोन वाजतो.) अहो, छबडीचाच ! अमेरिकेतून !

प्रभास : ओ. के. तू जपान – बबडी. मी अमेरिका – छबडी. (हात सोडतो.)

प्रेमला : हॅलो... कोण ? बबडी का ? वा : ! हो. हो. गुड इव्हिनिंग ! व्हेरी गुड इव्हिनिंग !

प्रभास : हॅलो... कोण ? छबडी का ? वा : ! हो. हो. गुड मॉर्निंग ! व्हेरी व्हेरी गुड मॉर्निंग!

प्रेमला : काय म्हणतेय माझी बछडी ?

प्रभास : गुड मॉर्निंग ! व्हेरी गुड मॉर्निंग ! आणि काय म्हणतेय माझी बडबडी ?

प्रेमला : गुड इव्हिनिंग ! व्हेरी गुड इव्हिनिंग ! (ऐकून) अहो, टोकियोचा सूर्यास्त किती छान आहे !

प्रभास : न्यूयॉर्कला सूर्योदय काय सुंदर दिसतोय !

प्रेमला : अहो, टोकियो शहर विजेच्या रोषणाईनं उजळून निघालंय.

प्रभास : अग, न्यूयॉर्कमधल्या गगनचुंबी इमारती सकाळच्या सोनेरी किरणांनी न्हाऊन निघाल्यात.

प्रेमला : अहो, बबडी डिनरची तयारी करतेय.

प्रभास : अग, छबडी ब्रेकफास्ट मांडतेय.

प्रेमला : अहो, बबडी टोकियो थिएटरच्या नाईट शोला जाणार आहे.

प्रभास : अग, छबडी न्यूयॉर्कच्या ऑफिसमध्ये ड्यूटीवर जाणार आहे.

प्रेमला : अहो, बबडीनं न् तिच्या नवऱ्यानं इव्हिनिंग ड्रेस केलाय.... फोटो काढा फोटो.

प्रभास : अग, छबडीनं न् तिच्या नवऱ्यानं ऑन ड्यूटी पोषाख केलाय.... फोटो काढा फोटो.

प्रेमला : आम्ही काय करतोय ? तू मुंबईहून टोकियोला पोचलीस अन् नाटकाला चाललीस ! छान ! मज्जा आहे ! आम्ही आत्ताच मुंबईहून पुण्याला पोचतोय !

प्रभास : आम्ही काय करतोय ? तू मुंबईहून न्यूयॉर्कला पोचलीस अन् कामावर चाललीस. आम्ही आत्ताच मुंबईहून पुण्याला पोचतोय !

प्रेमला : आणखी काय करतोय ? दारंखिडक्या उघडतोय. घर स्वच्छ करतोय. आंघोळी करतोय. पोटपूजा करतोय.

प्रभास : आम्ही काय करतोय ? आम्ही काही करत नाही आहोत. काही म्हणजे काही नाही. म्हणजे आई जेवण करते आहे किचनमध्ये. मी पेपर वाचतो आहे हॉलमध्ये. दुसरं काय ? दुसरं काही नाही. का...ही नाही. सगळं ठीकच आहे !

प्रेमला : आम्ही अगदी आनंदात आहोत. तुम्हीपण आनंदात राहा हं !

प्रभास : हां. हां. मजा करा. गुड डे, बछडे !

प्रेमला : हां. हां. गुडनाइट, व्हेरी व्हेरी गुड नाइट, लबाडे !

(फोन ठेवतात.)

प्रभास : प्रेमले, गुडनाइट म्हणालीस. नाइट गुडच झाली पाहिजे.

प्रेमला : अहो, आपण भारतात आहोत. नाइटला अजून खूप अवकाश आहे.

प्रभास : अग, दिवस म्हणजे रात्रीची तयारी. डे अँड नाइट.

प्रेमला : तुम्हाला दुसरं काय सुचतंय ? किती लांबलांब गेल्या माझ्या लाडक्या लेकी. जगाच्या दोन टोकांना. कसं होईल हो त्यांचं ? (बसून रडू लागते.) काय करत असतील आत्ता बिचाऱ्या ?

प्रभास : बिचाऱ्या ? अग सोन्याचे डॉलर मिळवताहेत त्या आणि त्यांचे नवरे. आणि तिकडे पैसा काही पुजायला मिळवत नाहीत ! मज्जा करायला मिळवतात.

प्रेमला : मला खूप काळजी वाटते हो ! (रडते.)

प्रभास : तुला सांगू छबडी काय करते आहे ?

प्रेमला : काही नको. तुम्हाला काय कळतंय ? तुमचं आपलं एकच. तिकडे पोरींना फोडणीचं सामान तरी मिळतं की नाही कुणास ठाऊक ! कशा जेवणार हो माझ्या मुली ?

प्रभास : छान ! त्यांच्या रोजच्या जेवणाची का काळजी करत बसणार तू ? अग, सगळीकडे भारतीय दुकानं असतात. माणूस तिथं मारवाडी. अन् आपल्यापेक्षा छान छान भारतीय पदार्थ मिळतात.

प्रेमला : पण ती दुकानं शोधायला नकोत ? सगळं सामान आणायला नको ?

प्रभास : तोपर्यंत हॉटेलात जातील की जेवायला ! अग काय उंची हॉटेलं असतात ! अन् हॉटेलांत काही नुसतंच वरणभात खात नाहीत.

प्रेमला : तिथं वरणभात मिळतो का हो ? नुसतीच दारू मिळत असणार.

प्रभास : अग घेतात थोडी थंडी कमी व्हावी म्हणून. अन् मग अशी तरतरी येते ! अन् मग जोड्यांनी नाच करतात. (तिला ओढत धडपडत नाच करतो.)

प्रेमला : अहो, सोडा, सोडा, पडेन.

प्रभास : अग तिकडे चार लोकांत बायको भेटली म्हणजे तिला मिठी मारावीच लागते. तिचा मुका घ्यावाच लागतो. नाहीतर लोकं म्हणतात, यांचं फाटलंय्, डायव्होर्स होणार....

प्रेमला : नको हो. मला आधी स्वच्छ तरी होऊ द्या. हा सगळा मेला अमेरिकन सिनेमांचा परिणाम ! सारखी दारू ढोसायची न् मिठ्या मारायच्या ! टी एन् टी म्हणजे ती अन् ती ! एक झाली की सोडून दिली अन् दुसरी घेतली. ती झाली की तिसरी ठेवलेलीच. जपानमध्ये, खात्रीनं सांगते, असला चवचालपणा मुळीच चालणार नाही. तिथं आपली बौद्ध संस्कृती असणार–अनासक्ती. भारतीय संस्कृती. आशियाई संस्कृती.

प्रभास : अग जपान म्हणजे हिंदुस्थान नव्हे. तिथं आहे गैशा संस्कृती. गैशा फार सुंदर, फार सुसंस्कृत कलावती असतात. सगळे मोठे पुरूष त्यांच्याकडे जातात. गैशाकडे न जाणं हेच चूक मानतात. गैशा आपल्या पेल्यातून आपल्या रसिकांना चहा पाजतात अन् हळूहळू त्यांना पेटवतात, चेतवतात, भडकवतात....अन् मग सोडून देतात..... सायोनारा....मग ते पुरूष वाघाच्या भुकेनं घरी येतात आणि पत्नीची कोवळी हरिणी करतात ! सायोनाऽऽऽऽऽरा !

सायोनाऽऽरा ! (जपानी पंखा घेऊन व एक चादर लपेटून गैशा नृत्य करून सायोनारा गाणे म्हणतो.) हे बघ छबडी गेलीय अमेरिकेत आणि बबडी गेलीय जपानात. पण इकडे माझ्यात चढलाय अमेरिकन तरूण आणि जपानी तरूण. दोन्ही एकत्र. दोन्ही एकदम. मी कॉकटेल पुरुष झालोय. आलोच. थांब. (किमोनोसारखी पांघरलेली चादर काढून गोळा करून फेकून देतो. तेवढ्यात ती पळून बाथरूममध्ये जाऊन आतून दार लावून घेते.)

प्रभास : (बाथरूमच्या दारावर थापा मारीत) बया, दार उघड. बया, दार उघड. बया, दार उघड.... नाही उघडत ? हरकत नाही. (बाथरूमचे दार काचेचे. त्यावर ओलेतीचे चित्र दिसते.) कधीतरी बाहेर येशीलच की नाही ? पाणीच संपेल. मग काय करशील ? मग बघशील माझ्याच अंगातलं पाणी. थांब. तुला दाखवतोच. तुझ्या सगळ्या साड्या न् सगळे ब्लाउज न् सगळे कपडे कुलपातच ठेवतो. अन् मग तुला पाहूनच घेतो ! (सूट केसेस, कपडे कपाटात टाकतो. चावी लावतो. किल्ली बोटाभोवती फिरवीत शीळ घालीत नाचतो. बाहेरच्या खोलीत येतो.) लाइफ बिगिन्स ॲट फिफ्टी ! पत्नी म्हणजे सुवर्णकळशी ! जीवनाची सुवर्णजयन्ती ! गोल्डन ज्युबिली ! पन्नाशीत जीवन सोन्याचं होतं ! सोनंच सोनं. मी झालोय किंग मिडास ! स्वर्णपुतळा ! बैस खुश्शाल आंघोळ करीत. हव्वी तेवढी कर. मला हवीच आहे. (दीर्घ श्वास घेत) आहाहा ! काय शाम्पूचा घमघमाट सुटलाय ! (पुन: श्वास घेत) आहाहा ! काय साबणाचा सुगंध मातलाय ! बच्चंजी, तुमचं भाग्य थोरच ! आजची रात्र सुगंधाच्या घनदाट रानात दरवळून जाणार ! वा : ! तिला गाणंपण सुचतंय ! म्हणजे खुशीत खुशी ! ('आली हासत पहिली रात' चे सूर ऐकू येतात.) दोन मुलींच्या गोड सहवासात स्त्रीसुखाला पूर्ण आचवलो. आता सगळं उट्टं काढणार. सोडणार नाही. सगळ्या सुखांचा राजा, राजा कसला, राणी हे सुख ! ती बाहेर येणार. कपडे दिसले नाहीत की ती तशीच घरभर हिंडत जाणार अन् शेवटी पाया पडणार. ती गोपी. मी कृष्ण. पूर्ण शरण आली म्हणजे मी पूर्वी आणून ठेवलेले हे कपडे देणार. हा पंजाबी ड्रेस देऊ का ? की ही मॅक्सी ? नको. नको. आज हा मिनिस्कर्टच. आजच्या प्रसंगाला हाच साजेसा. अन् हा ड्रायर, हे कंगवे, या हेअर क्लिप्स. स्कर्टला मॅचिंग हेअरस्टाइल झालीच पाहिजे ' (स्कर्ट छातीशी घेऊन नाच करतो.) अन् मूड रंगायला ही कॉस्मेटिक्स, स्नो, पावडर्स, सेंटस्, फ्रॅग्रन्स. काय प्रगती झालीय

जगाची ! आज सगळा स्वर्ग पृथ्वीवर आणायचा ! मी इंद्र. ही अप्सरा. अमृत ? हां. झक्क कॉफी आणून ठेवलीय दळलेली. स्ट्राँग कडक कॉफी. पोटाचा उपास मुसुंब्याच्या रसानं सोडतात. हा उपास आम्ही एका ग्लासमधून कॉफी घेऊन सोडणार ! कॉफीनं प्रतिभेला चालना मिळते. माझी प्रतिभा पेटली आहे. ती कॉफीनं भडकणार ! अन् मग मदनमस्त व्हिडिओकॅसेट ! (कॅसेट लावतो) वा ! बॉलडान्स....वॉल्टझ्.....पोल्का.....! मिठी मारून..... गालाला गाल लावून ! खूप खूप मनसोक्त खेळ खेळणार....मगच शृंगाराचा क्लायमॅक्स ! अभी तो मै जवान हूं ! (नाच करून गिरकी घेतो.) पण हे काय ? अजून हिची आंघोळच कशी आटपत नाही ? (आतल्या खोलीच्या दाराशी जातो. आतली खोली एकदम उजळते. आत ती संत साध्वी स्त्रीच्या भगव्या पेहेरावात केस सोडून मांडी घालून ध्यानस्थ बसली आहे ! समोर दोन बाजूंना दोन समया लावलेल्या असून मध्यभागी उदबत्त्या लावल्या आहेत. मागे फलक – 'जगन्माता जगदंबिका प्रसन्न '.

प्रभास : माते, आमचा साष्टांग दंडवत ! (पडतो.) (घंटा वाजतात. आरतीची धून ऐकू येते.) (उठून) प्रेमले, अग हे काय चालले ? आपला गृहस्थाश्रम चालू आहे की संन्यासाश्रम ?

प्रेमला : गृहस्था,श्रमी होऊ नका. शांत व्हा.

प्रभास : माझ्या देहाला अनावर भूक लागली आहे. ती शमल्याशिवाय कसा शांत होऊ ?

प्रेमला : क्षुद्र देहात अडकून पडू नका. त्यातल्या आत्म्याला काळोखातून बाहेर काढा.

प्रभास : घे हा माझा देह तुझ्या मांडीवर अन् काढ आत्म्याला बाहेर.

प्रेमला : तुमचा उद्धार तुम्हीच केला पाहिजे. आदिमातेचं ध्यान धरा.

प्रभास : मी तुझं ध्यान धरतोय ना ! तूच माझी देवी. प्रेमलादेवी !

प्रेमला : आदिमातेची आरती करा. आदिमातेला आवाहन करा.

प्रभास : मी तुला केव्हाचं आवाहन करतो आहे.

प्रेमला : जागे व्हा. जागृत राहा.

प्रभास : चांगला जागाच आहे. जास्तीत जास्त जागृतच आहे. जागृत ज्वालामुखी ! झोप येणारच नाही आहे.

प्रेमला : सत्संग करा म्हणजे मनात सुविचार येतील.

प्रभास : सुविचारांनी तर माझ्या मनात कधीची गर्दी केली आहे. अन् तू सत् आहेसच ना ? तुझाच संग मी मागतोय.

प्रेमला : तुमचा माझा संग सत्संग कसा होईल ?

प्रभास : तुझामाझा संग सत्संग नाही ! मग काय आहे ? अग, साधू पुरूष आपल्या स्पर्शानं भक्ताला प्रेमदान करतात. (पुढे जात) मला जवळ घे. प्रेमदान कर.

प्रेमला : अहो, मी सोवळ्यात आहे.

प्रभास : अन् मी काय ओवळ्यात आहे ? म्हणशील तर पाच मिनिटात आंघोळ करून येतो.

प्रेमला : देहाची आंघोळ काय कामाची ? आत्मा स्वच्छ झाला पाहिजे.

प्रभास : अग पण आत्मा देहातच आहे ना ? चल. घाल या देहाला आंघोळ. (जवळ जातो.)

प्रेमला : शिवू नका.

प्रभास : आता ?

प्रेमला : अहो मी तपश्चर्या करते आहे. माझी कुंडलिनी जागृत होऊ लागली आहे.

प्रभास : कुठे आहे ?

प्रेमला : श्रद्धा ठेवा म्हणजे दिसेल.

प्रभास : माझी तुझ्यावर श्रद्धा आहे. मला फक्त तू दिसते आहेस.

प्रेमला : मी योगिनी आहे. माझ्यात शक्ती अवतरली आहे. माझ्या अंगात लहरींचा –वेव्हस्‌चा– संचार झाला आहे. हा पाहा. मी हात वर केला. या माझ्या बोटातून शक्तीच्या लाटा बाहेर पडणार आणि माझ्या बबडीच्या भोवती राहून तिचं रक्षण करणार. हा दुसरा हात उचलला. या माझ्या बोटातून शक्तीच्या लाटा बाहेर पडणार आणि माझ्या छबडीच्या भोवती राहून तिचं रक्षण करणार. (तो रेडिओची अँटेना वर करून बघतो.) हे आहे आमचे सुरक्षाचक्र !

प्रभास : छान ! हे आहे आमचे सुरक्षा चक्र ! अन् माझी सुरक्षा ?

प्रेमला : हात वर करा.

प्रभास : (करून) केले.

प्रेमला : देवीचं ध्यान करा.

प्रभास : करतोच आहे.

प्रेमला : झाली का कुंडलिनी जागृती ?

प्रभास : काखा वर केल्या की झालीच !

प्रेमला : इन्स्टंट कुंडलिनीजागृतीच्या शक्तीची मला प्राप्ती झाली आहे.

प्रभास : मला फक्त इन्स्टंट कॉफीची माहिती आहे. चल. घेऊ या.

प्रेमला : कुंडलिनी जागृत झाल्यावर ती मस्तकाच्या तळ्यातील अमृत पिते. कॉफी नव्हे.

प्रभास : प्रेमले, प्रेमले, प्रेमले, अग, पूर्वजन्मीच्या सुकृतानं, गुरूच्या कृपेनं, हिमालयातील तपश्चर्येनं, योगायोगानं एखाद्याची कुंडलिनी कधी नि कधी जागृत होते. ती कुंडलिनी इथं आपल्या बेडरूममध्ये कशाला येईल ? ये. तू माझ्या हाताला हात लाव. मी तुझ्या हाताला हात लावतो. क्षणार्धात प्रेमसमाधी लागेल. ऐक. वैदिक सूक्तच म्हणतो. अगस्तिलोपामुद्रासंवाद !

मी अगस्ति. तू लोपामुद्रा.
समर्थ मी. यशपूर्ण मी. तरूण मी. धनयुक्त मी.
मी वीर्यवान. मी धैर्यवान. संसारकार्या सिद्ध मी.
अबलाच तू. मृदुलाच तू. कमलाच तू. तू प्रेमला.
तरिही मला केलेस तू विद्ध आणिक क्षुब्धही.
ओघ जैसा जलनदाचा रोधिला की धावतो
अधिकची वेगे तसा मी तुजकडे झेपावतो.
तूहि ये माझ्याकडे तैशीच तुज आलिंगितो.
काळ जातो भरभरा करु ये त्वरा मी प्रार्थितो.
संसारसौख्या ये लुटू अन् तेच वाटू वंशजां.
चल ये, चल ये, चल ये, बये.
ॐ शान्ति : ! शान्ति : ! शान्ति : !

प्रेमला : मला मोहात पाडू नका. मी नाही लोपामुद्रा अन् तुम्ही नाही अगस्ती. मी प्रेमला. तुम्ही प्रभास. माझ्यात उत्पन्न झालेल्या प्रेमलहरी, लव्हवेव्हस् –

प्रभास : शॉर्ट, लाँग, की मिडियम ?

प्रेमला : चेष्टा करू नका. देवीचा कोप होईल. माझ्या लव्हवेव्हस् पृथ्वीला प्रदक्षिणा घालून आपल्या लेकींच्या कल्याणाला जात आहेत. त्यात अडथळा आणण्याचं पाप करू नका. माझ्या प्रेमलहरी लव्हवेव्हस् – जाता जाता वाटेत सर्वांचं कल्याण करतात.

प्रभास : माझं ?

प्रेमला : तुमचंसुद्धा.

प्रभास : मग, मी येऊ ?

प्रेमला : थांबा. प्रेमलहरींच्या वेव्हस् रेडिओ लहरींसारख्याच असतात. माझ्या

बोटांतून त्या निघतात. उंच स्वर्गलोकांपर्यंत जातात आणि तिथून मांगल्य आणि पावित्र्य घेऊन परततात आणि मानवतेचं कल्याण करतात. म्हणून दूर व्हा. दुरून हा अनुभव चांगला येतो. जवळून येत नाही. दूर व्हा. दूर व्हा. ट्रान्सफॉर्मरनं रेडिओलहरींची शक्ती वाढवता येते. त्याप्रमाणं पोथ्यांच्या वाचनानं मनाची शक्ती वाढते आणि अधिक पॉवरफुल वेव्हस् बाहेर पडतात. बबडीसाठी गुरुचरित्राचं आणि छबडीसाठी शनिमाहात्म्याचं सहस्त्रचक्र पारायण मला करायचं आहे. (पोथी वाचू लागते.)

प्रभास : नवरा करी आराधना बायको प्रसन्न होईना. बायको हाताशी अन् नवरा उपाशी. नवरा लागे बायकोमागे बायको लागे देवामागे. नवरा मागे बायको. बायको झाली सायको. रामबाण फुकट गेला. सगळं फुकट. आता माझ्या पंचवीस वर्षांच्या उपासाचं पारणं कसं फेडू ? या उपासानं माझी तडफड होत आहे. जीव जाण्याची वेळ आली आहे. (बाहेर येऊन) कशाला मी हे कपडे आणले ? कशाला ही कॉस्मेटिक्स ? कशाला ही कॅसेट ? आता काय करू ? आता मन कसं आवरू ? हे भरकटणारं तारू कुठल्या किनाऱ्यावर उतरू ?... (फोन उचलून नंबर फिरवून) माय डिअर फ्रेंड.... माय डिअर फ्रेंड मधुपा... तुझा लंगोटी यार प्रभास.... प्रभास बोलतोय.....माझी बायको....तुझी वहिनी (रडतो) तुझी बायको..... माझी वहिनी आहे का ? (मोठ्याने रडतो) (जरा वेळ रडून फोन खाली ठेवतो.) गरज भागवतो तोच मित्र म्हणवतो.

धावत येइ मध्या.... गद्ध्या ऽ
स्कूटरवरुनी टॉप गिअरमधुनी
धावत येइ मध्या.... गद्ध्या ऽ
ना तरि जाया जाइल विलया
धावत येइ मध्या.... गद्ध्या ऽ
बघ आचरिला कामविधी मी
तव साह्याविण जाइल वाया
धावत येइ मध्या.... गद्ध्या ऽ
घेउनि सुंदर तरूणी पत्नी
धावत येइ मध्या.... गद्ध्या ऽ

(स्कूटरचा आवाज. हॉर्न. हा जाऊन दार उघडतो.)

(नट दिसावा असा रंगीबेरंगी पोषाख केलेला तरूण मधुप आणि नटीच

वाटावी अशी तरूणी मधुरा घाइघाईने कावरेबावरे होऊन प्रवेश करतात.)

मधुप : कोण ?

प्रभास : तुझी वहिनी.... माझी पत्नी.....

मधुरा : (किंचाळते) केव्हा ?

मधुप : कुठे ?

प्रभास : तिथे. (मित्राच्या गळ्यात गळा घालून रडतो. मित्र, त्याची बायको सर्व मोठ्याने रडतात.)

मधुप : डॉक्टरना फोन करतो. सर्टिफिकीट लागेल.

प्रभास : (गळा काढून) मध्या, गाढवा, तूच माझा डॉक्टर.

मधुप : साल्या, मी डॉक्टर नाही. मी अॅक्टर. शुद्धीवर आहेस की दारू प्यायली आहेस ?

प्रभास : अरे, तू मोठा अॅक्टर आहेस म्हणूनच मला डॉक्टरसारखा उपयोगी पडणार आहेस. आधी पेशंट बघून तरी घ्या दोघं.

मधुप : (बघून) असं कसं झालं?

मधुरा : अगबाई, देवी आल्या ! म्हणजे, बाई देवी कशा झाल्या ?

प्रभास : बाई देवी नाही झाल्या. त्यांच्या अंगात देवी आल्यात. अंगात आलेल्या देवी काढल्या पाहिजेत.

मधुरा : वेड्यांच्या डॉक्टरांचं काम हे. इथं आम्ही काय करणार ?

प्रभास : तुम्हीच मला वाचवणार.

मधुरा : अहो, पेशंट तुमची बायको की तुम्ही ?

प्रभास : ट्रीटमेंट बायकोला पण जीवदान मला.

मधुरा : मी अॅक्ट्रेस. मी नटी. मी काय करणार ?

प्रभास : विषावर विषाचाच उतारा करतात ना ?

दोघे : बाप रे !

प्रभास : तसंच करायचं !

दोघे : म्हणजे ?

प्रभास : बबडी न् छबडी.....

मधुप : सुखरूप पोचल्या ना ?

प्रभास : त्या दोघी तिकडे सुखात न्हात आहेत अन् त्यांच्या विरहानं ही इकडे दु:खात न्हात आहे.

मधुरा : अगबाई ! म्हणजे ?

प्रभास : हे बघा. दोघींसाठी दोन फोन घेऊन ठेवलेत. एकाच वेळी आलेत आणि दोघींचे एकदम पोचल्याचे निरोप आलेत. त्या दोघी तिकडे आनंदानं किंचाळताहेत, नाचताहेत आणि त्यांच्या नसत्या काळजीनं इकडे ही ही अध्यात्माची साधना करतेय. पोथ्यांची पारायणं करून ती पॉवर निर्माण करतेय आणि लाडक्या लेकींकडे वेव्हस् पाठवतेय ! हे आहे आमचे सुरक्षाचक्र ! बबडीला न् तिच्या नवऱ्याला एक सुरक्षाचक्र अन् छबडीला न् तिच्या नवऱ्याला दुसरं सुरक्षाचक्र ! ही दोनदोन सुरक्षाचक्रं सारखी त्यांच्या भोवती भोवती फिरत राहिली पाहिजेत ना म्हणून ही हिची पारायणचक्रं ! या सगळ्या चक्रांत सापडून मलाच चक्कर यायला लागलीय्. मी चक्काचूर होणार !

मधुप : पण हा सायकोइमोशनल स्पिरिच्युअल वेव्हस् निर्माण करणारा पॉवरफुल जनरेटर आम्ही कसा बंद करणार ?

प्रभास : हे बघा, माझ्यावर तुमचा दोघांचा पूर्ण विश्वास आहे ना ?

मधुरा : प्रश्नच नाही.

प्रभास : मग सांगा, एका स्त्रीला सगळ्यात जास्त राग कुणाचा येतो ?

मधुरा : सवतीचा.

प्रभास : शंभर टक्के बरोबर बोललात. माझ्यावर दया करा. तुम्ही नटी आहात. तुम्ही तिची सवत झाल्याचं नाटक करा. फक्त नाटक. म्हणजे ती चिडेल आणि या वेडातून बाहेर पडेल. तुम्ही माझ्यावर जसंजसं जास्त प्रेम करू लागल्याचं तिला दिसेल तसंतसं ती तुम्हाला दूरदूर ढकलू लागेल आणि मला जवळ–जवळ ओढू लागेल. तुम्हाला ती घरातून बाहेर हाकलून देईल अन् मी तुमच्या मागे लागू नये म्हणून मला घट्ट मिठी मारून पकडून ठेवील.

मधुप : फिट्ट ! प्रभ्या, पण हे फक्त नाटकच ना ?

प्रभास : आम्ही दोघं नाटक करतो. तू दिग्दर्शक हो.

मधुरा : मी नाही बाई. मी स्टेजवर नाटकं करते. प्रेक्षकांसमोर करते. अशी बंद घरात नाही.

प्रभास : वहिनी, शेक्सपिअर म्हणतो, सगळं जग म्हणजेच एक मोठी रंगभूमी आहे. वहिनी, तुम्ही खऱ्याखुऱ्या नाट्यप्रेमी आहात ना ?

मधुरा : नको. नको. मला संकोच वाटतो. तुम्ही ही केस सायकिॲट्रिस्टकडे द्या कशी. मला नको.

प्रभास : नको, वहिनी. सायकिअ‍ॅट्रिस्टकडे गेलो की ते हॉस्पिटलमध्ये अ‍ॅडमिट करा म्हणणार. शॉक देणार आणि बबडीछबडींना हे कळलं की विनाकारण त्या काळजीत पडणार आणि धावत – चुकलो, उडत–उडत येणार. त्यांच्यामागे त्यांचे नवरेपण येणार. आणि हा खर्च एवढा मोठा होणार की बाकी सगळी संपणार आणि खर्चाचा डोंगर वाढणार. इतका वाढणार की बबडीछबडींना नि त्यांच्या नवऱ्यांना परत जायलासुद्धा काही नाही मिळणार. मग मी, माझी बायको, बबडी, छबडी, बबडीचा नवरा, छबडीचा नवरा सगळ्यांनाच वेड लागणार आणि आम्ही सगळेच वेडे झाल्यावर आमची काळजी घ्यायला शहाणे कोण उरणार ? मित्रा मधुपा, मधुरा वहिनी, तुम्ही शहाणे आहात. या वेडापासून आम्हांला वाचवा. पदर पसरून, नाही मनिल्याचा खिसा पसरून, मी तुमच्यापुढे भीक मागतो. तुमचे पाय धरतो. (दोघांचा एकेक पाय धरतो.)

मधुप : ए गाढवा, तिच्या अंगाला हात नको लावू. ती बायको आहे माझी.

प्रभास : अंगाला नाही. पायाला.

मधुप : पायाला हात लावशील तर ती लाथ मारील.

प्रभास : म्हणजे तीच माझ्या अंगाला स्पर्श करील.

मधुप हे बघ, नाटकात शृंगार करायचा नाही. शृंगाराचं नाटक करायचं.

प्रभास : म्हणजे शृंगार करायचा पण देहात अंगार करायचा नाही. देह गारच ठेवायचा.

मधुप : अंगार बायकोच्या अंगात फुलवायचाय ना ? मग माझं दिग्दर्शन ऐका. काळजीपूर्वक ऐका. या नाटकाच्या खेळात तुम्ही भिडू असलात तरी एकमेकांना भिडू नका. नायकनायिका एकमेकांना भिडण्यापेक्षा, आत्ता भिडणार, आत्ता भिडणार, असं प्रेक्षकांना भासवण्यातच जास्त शृंगार निर्माण होतो.

प्रभास : नटानं आपल्या मनात भावना मुळीच निर्माण करायची नाही ?

मधुप : नाही, नाही. करायची. नटनटींच्या मनात खरीखुरी भावना निर्माणच झाली नाही तर प्रेक्षकांना तरी कशी जाणवणार ? नटनटींच्या मनांत दुप्पट भावना निर्माण झाली म्हणजेच प्रेक्षकांच्या मनांत निमपट तरी संक्रान्त होते. आग पाहिजे तरच धग लागेल.

प्रभास : धग लागायच्या ऐवजी आगच लागली म्हणजे ?

मधुप : हे बघा, विजेच्या वायरच्या दोन तुकड्यांत वीज आलीच पाहिजे पण स्पार्क पडून आग लागणार नाही इतक्या दूर दोन्ही तारा ठेवल्याच पाहिजेत. तुम्ही

भावना निर्माण करा. वीज उत्पन्न होऊ द्या. मी स्विच बंद ठेवतो. स्टार्ट. ॲक्शन.

प्रभास : मधुरावहिनी, चला. प्रेमलाच्या खोलीत जाऊ. तिथंच आपल्या खोट्या प्रेमाचं खरं प्रदर्शन करू. (प्रभास आणि मधुरा आत जातात.) हां. नाच.

मधुरा : मी चारित्र्याची नाटकं करते. नाचत नाही.

प्रभास : तू जन्माला आली आहेस ना ?

मधुरा : म्हणजे ?

प्रभास : तेव्हा हातपाय झाडलेस आणि किंचाळलीस ना ? तसंच पुन: आज. तोच नाच. तेच गाणं. म्हण माझ्याबरोबर.

शाळाकॉलेज सोडू या
प्रेमानंदी नाचू या
नोकरीधंदा सोडू या
प्रेमानंदी गाऊ या
घरकाम दारकाम सोडू या
प्रेमानंदी डुंबू या.

प्रभास : बार फुसकाच ! मग, डायलॉगबाजी करू या. चल. स्टार्ट. ऐक. मधू, मधुरा, तुझं नावसुद्धा कित्ती गोऽड आहे. तू सगळीच गोड आहेस. तुझ्या अंगात रक्त नाही आहे. गोड दूध आहे. म्हणूनच तुझा रंग गोरा झाला आहे. हे बघ, ही माझी बायको. आजीबाई झाली आहे. पोथ्या वाचती आहे. वाती वळून समया पाजळते आहे. हिचं सगळं लक्ष पोथ्यांत, देवांत आणि धर्मांत आहे ! चल. आपण बागेत जाऊ. सिनेमाला जाऊ. हॉटेलात जाऊ.

मधुरा : मलासुद्धा माझ्या नवऱ्याचा अगदी कंटाळा आला आहे. आधीचाच आळशी आणि आता अकाली म्हातारा झालाय. बुढ्ढा ! आमच्या प्रेमात खड्डा ! काही कामाचा नाही. नुसता पडलेला असतो. तुम्ही कित्ती छान आहात. कित्ती तरूण आहात. कित्ती स्मार्ट आहात. मला तुम्ही फार फार फार आवडता.

प्रभास : आय लव्ह यू !

मधुप : आय लव्ह यू ! मग, आपण लग्न करू या ? (जवळ जातो.)

प्रभास : (बाहेरून) कट्......कट्......कट् कट्. (दोघे दूर होतात.)
अजून ही जागेवरून कशी उठत नाही ? विश्वामित्राची समाधी मेनकेनं भंग केली. हिची समाधी भंग करायला आम्ही आलोय. पण ही तर विश्वामित्राहून

वरचढ दिसतेय. (मधुराला) तुझ्याशिवाय मला क्षणभरही चैन पडत नाही. रात्रभर तू माझ्या स्वप्नात नाचत असतेस, गात असतेस, खिदळत असतेस.

मधुरा : तुमच्या स्वप्नात नाचून नाचून मी दमून जाते. मग तुम्ही माझ्या स्वप्नात येता, माझे पाय चेपता, माझं अंग दाबता.....

प्रभास : अरेच्या, नखं कापायची राहिलीच.

मधरा : तरीच माझ्या सगळ्या अंगावर ओरखडे दिसताहेत.

प्रभास : बघू. बघू. (जवळ जातो.)

मधुप (बाहेरून) कट् ...... कट्...... कट् कट् (दोघे दूर जातात.)

प्रभास : मग सांग ना गडे, आपण लग्न केव्हा करायचं ?

मधुरा : हनीमूनला कुठे जायचं ?

प्रभास : अर्थात गोव्याला. पण घर कुठं करायचं ? ही या आश्रमाची माता झालीय. तू लवकरच खरीखुरी माता होशील.

मधुप : (बाहेरून मोठ्याने) कट् ...... कट्...... कट् कट् (दोघे दूर.)

प्रेमला : मी येथे ध्यानधारणा करतेय आणि कटकट कोण करतंय ?

प्रभास : आम्ही नाही.

मधुरा : आम्ही नाही.

प्रेमला : तुम्ही इथं काय करताय ?

प्रभास : अं.......अं.....प्रेम ! लव्ह ! एल्.....ओ......व्ही......इ......

प्रेमला : (मधुरास) आणि तुम्ही ?

मधुरा : तेच. तेच. इलू......इलू.....आय लऽऽव्ह यू !

प्रेमला : मग कटकट कोण करतंय ?

प्रभास : (मधुराला) चल. बाहेर जाऊन बघू या. (दोघे बाहेर येतात.)

प्रभास : (मधुपला) अहो डायरेक्टर, तुम्ही दाराबाहेर जा.

मधुप : मुळीच नाही. तुमचं आता डायरेक्ट सुरू झालंय ! मी तुम्हाला इनडायरेक्ट करायला सांगितलं होतं. काय गं, खुश्शाल मला नावं ठेवतेस ? माझी टिंगलटवाळी करतेस ? मला म्हातारा म्हणतेस ?

मधुरा : (रडत) नाटकातल्या भावनेलासुद्धा नटनटींच्या आयुष्यांतल्या खऱ्या भावनेचा पाया पाहिजे म्हणता ना तुम्ही ? कल्पनेची इमारत सत्याच्या पायावरच ना ?

मधुप : सत्य फार होतंय. असत्य कमी होतंय.

प्रभास : (मधुपला) तुम्ही थोडी कळ काढा हो. थोडा वेळ बाहेर व्हा हो. (बाहेर ढकलतो.)

प्रेमला : (बाहेर येत) शांतता.... शांतता....सगळे शांत व्हा. माझ्या मनातील शांतता मी आता तुमच्या मनांत संक्रान्त करते. वेव्हस् आल्या... वेव्हस्..

प्रभास : शांतता भंग होण्याचं काही चिन्ह नाही ! बर्फ पेटत नाही. शेवटचा जालीम इलाज करू या. लाडके, ही जगन्माता आपली शांती आपल्याला देईल तेव्हा डोळे मिटून घेईलच. तिने डोळे मिटले की आपण ओठ मिटू.

प्रेमला : (मोठ्याने) ॐ शांति : ! शांति : ! शांति: !

(प्रभास मधुरेला खूण करून सुचवतो की आपल्या स्वत:च्याच मनगटाची खूप जोराने आवाज करून चुंबनं घे. दोघे तसे करतात. प्रेमला डोळे उघडते. मधुप रागाने धावत आत येतो व प्रभास आणि मधुरेच्या अंगावर हात उगारून धावत जातो. इतक्यात दारात एक स्वामी येतो.)

स्वामी : शांति : ! शांति: ! शांति : ! हिंसा करू नका. हिंसा म्हणजे महत्पाप !

प्रभास : महाराज, आपण कोण ?

स्वामी : भगवान प्रेमानंद ! जगन्माता जगदंबिका महामाया प्रेमलादेवी ही आमची प्रियतमा....शिष्या ! आमच्या चरणकमलाजवळ बसूनच तिनं अध्यात्माचे पाठ घेतले. आम्ही तिच्या मस्तकावर करकमल ठेवून तिला शक्ती संक्रान्त केली. आता ही सगळ्या जगात पॉवरबाज लहरी धाडू शकते. याच प्रेमलहरी तिनं आमच्याकडे पाठवल्या. म्हणूनच प्रिय प्रेमाच्या ओढीनं आमचे चरण इकडे वळले. आता आमचा मुक्काम या प्रियतमा शिष्येच्या आश्रमात !

(स्वामी प्रेमलेकडे जातो. मधुप व मधुरा कपाळावर हात मारीत मटकन सोफ्यावर बसतात. प्रभास चक्कर येऊन खाली स्वामींपुढे आडवा पडतो.)

# चल ये, चल ये, चल ये, बये !
## (बबडी आणि छबडी)
## अंक दुसरा

(आतल्या खोलीत कॉटवर प्रेमानंद. शेजारी खुर्चीवर प्रेमला. प्रभास बाहेरून चोरपावलाने आत येतो. चिंताग्रस्त होऊन येरझारा घालतो. टेपरेकॉर्डर लावतो. वरचेवर दारातून चोरून आतल्या खोलीत पाहतो.)

प्रेमला : माझी बबडी..... माझी छबडी. मला सोडून कशा हो गेल्या ? (रडते.)

स्वामी : गेल्या ? अरे अरे अरे अरे ! (तिचे डोळे पुसतो.) ईश्वरेच्छा !

प्रेमला : गेल्या म्हणजे गेल्या नाहीत. विमानांतून गेल्या.

स्वामी : कुठं ?

प्रेमला : बबडी, जपानात. छबडी, अमेरिकेत. किती हो लहान होत्या ! (रडते.) (स्वामी जवळ जातो. डोळे पुसतो.)

स्वामी : किती ?

प्रेमला : बाहुलीएवढ्या.

स्वामी : अरे अरे अरे अरे ! कशा पाठवल्यात तुम्ही ?

प्रेमला : बाहुलीएवढ्या होत्या झाल्या तेव्हा.

स्वामी : त्याला किती दिवस झाले ?

प्रेमला : फक्त पंचवीस वर्षं. मला फार फार आठवण येते हो !

स्वामी : (तिचे डोळे पुशीत) दोघींनाही पंचवीस वर्षं ? म्हणजे जुळ्या की काय ?

प्रेमला : होय हो. म्हणूनच दुप्पट दु:ख होतंय.

स्वामी : रडू नको. सगळा भार आमच्या अंगावर टाक अन् पूर्ण मोकळी हो म्हणजे दु:खाचा. तुझ्या मुली तुझ्यासारख्याच असतील ना ?

प्रेमला : हो ना. जपानीला मी ज्यूडोकराटे शिकवलंय आणि अमेरिकनीला रेस्लिंग–बॉक्सिंग. पण कोण बघणार हो त्यांना ?

स्वामी : आम्ही ! आम्ही बघतो ना. पूर्ण बघतो. अंतर्दृष्टीने बघतो. त्यांच्यासाठी प्रार्थना करतो. सगळं करतो.

प्रभास : घरघुश्या, मी पण तुला बघतो. तुला आसमान दाखवतो. तारे दाखवतो. सगळं करतो.

प्रेमला : त्या गाड्या चालवतात. ऑफिसं चालवतात. पण त्यांचं कोण हो चालवणार ?

स्वामी : आम्ही ! त्यांना तुम्ही सोडा आमच्यावर. आम्ही येथे समाधी लावून तिसरा

डोळा उघडला की तेथे त्यांच्या सगळ्या शत्रूंचं भस्म करणार ! अन् ते आपल्या अंगाला फासणार !

प्रेमला : पण ते फासायला तिकडे जायला नको का ?

स्वामी : जाणार ! तुला घेऊन जाणार ! त्यांना फोन करून सांग की जगद्‌गुरू भगवान प्रेमानंद स्वामी महाराजजी विश्वात प्रेमसंचार करण्यासाठी पृथ्वीप्रदक्षिणा करीत आहेत. त्यांच्या स्वागताची जय्यत तय्यारी करा !

प्रेमला : अय्या खरंच ? कित्ती मज्जा ! पण कसं ?

स्वामी : सत्य संकल्पांचा दाता भगवान ! फोन कर. फोन कर.

(ती फोन करते.)

प्रेमला : मी एका पायावर तयार आहे. पण यांना चार पाय असले तरी हलायचे नाहीत.

स्वामी : ते नकोत. फक्त तूच पाहिजेस.

प्रेमला : का ?

स्वामी : ते नास्तिक, निरीश्वरवादी, पाखंडी, जडवादी, श्रद्धा न ठेवणारे. श्रद्धा पाहिजे ! म्हणजे सगळं सुरळीत होतं. श्रद्धा ! विश्वास !

प्रेमला : मला पूर्ण विश्वास आहे – मी घराबाहेर पडले की यांनी घरात दुसरी बाई आणलीच. ठेवलेलीच आहे !

स्वामी : ठेवलेलीच आहे ? कुठे ? बघू.

प्रेमला : बघून ठेवलेलीच आहे. जळ्ळे मेले हे नवरे आणि जळ्ळया मेल्या त्या नटव्या– सटव्या.

स्वामी : कलियुग ! पण चिंता नको. तू आमच्या अंगावर तुझा सर्व भार टाक आणि पूर्ण मोकळी हो ! आमच्याजवळ नवऱ्याच्या वशीकरणाचा आणि सवतीच्या विनाशाचा वैदिक मंत्र आहे. (खिशातून एक दगड काढून) हा बघ. हा तुझा नवरा. नर्मदेतला आहे ! कसा गुळगुळीत मऊसूत आहे ! याची पूजा कर – मी सांगतो–म्हणजे तुझा नवरापण मऊसूत येईल. तुझ्याकडे बाहुली असेलच ना ? आण लवकर (आत जाऊन ती एक बाहुली आणते.) छान. ही तुझी सवत. हिच्यावर करणी करायची. म्हणजे तुझ्या सवतीचं मरण होईल. हं म्हण–ॐ माझ्या पूर्ण पुरूषाचं पूर्ण सुख मला पूर्ण मिळू दे. माझ्या सुखात विष कालवणाऱ्या माझ्या नटव्या–थटव्या सवतीचं पूर्ण तळपट्ट होऊ दे. माझ्या पूर्ण पुरूषाचं पूर्ण आरोग्य संपूर्ण होऊ दे. आणि त्याचा पूर्ण लाभ मला एकटीलाच पूर्ण होऊ दे. माझ्या सवतीचा पूर्ण सत्यानाश संपूर्ण होऊ दे. मी पूर्ण जेवण सिद्ध केले आहे. त्याचा पूर्ण लाभ माझा पूर्ण पुरूष पूर्ण घेऊ दे. मी

धरणीतून खणूनउकरून विषवल्ली काढली आहे. ती माझी सवत पूर्ण खाऊ दे. हे देवांनो, तुम्ही पूर्ण आहात. तुम्ही पूर्ण सुख पूर्णपणे घेता. हे भगवान, त्याचा प्रसाद मला द्या. तुम्हाला मी सोम देईन. तुम्हाला मी हवी देईन. सर्व देईन. तथास्तु ! ॐ शांति : शांति : शांति : ! (तिचा हात धरून तो यज्ञ, पूजा करतो. आहुती देतो. मंत्र म्हणवतो.)

प्रेमला : पण भगवान्, आपल्याबरोबर मी पृथ्वीप्रदक्षिणा करणार. माझा नवरा इथेच राहणार. मग हे कसं होणार ?

स्वामी : मंत्र आठव. नीट आठव आणि सतत जप. तू आमच्या अंगावर तुझा सर्व भार टाक आणि पूर्ण मोकळी हो ! प्रेमले.....प्रिये.....शिष्ये..... तू सिद्धी, आम्ही सिद्ध. तू शक्ती, आम्ही शिव. तू जगन्माता, आम्ही जगत्पिता. आपल्यांतलं पवित्र नातं तुझ्या नीट ध्यानात आलं ना ?

प्रेमला : भगवान, कधी कधी मला समाधी चढते. पण कधी कधी समाधी उतरते. असं का होतं ? समाधी कायमची का लागून राहत नाही ?

स्वामी : आम्हाला कायमची लागून बैस. जसजशी शिष्याची किंवा शिष्येची पात्रता वरवर चढत जाईल तसतसे गुरू अधिक अधिक वरची समाधी देत असतात. साधकाला प्रथमावस्थेत फक्त नजरेनं, द्वितीयावस्थेत करस्पर्शानं, तर तृतीयावस्थेत अंगस्पर्शानं गुरू योगदान करीत असतात. तुझा प्रवेश तृतीयावस्थेत झाला आहे. प्रिये, शिष्ये, आता आम्ही आणखी जप करून तप करतो आणि तुला अखंड समाधीचे सौभाग्य देतो. पण आमची जपमाला कुठं गेली ? इथं येण्यापूर्वी आम्ही समाधी लावली. आमचं देहभान गळून पडलं अन् हातातली जपमाळही पडून गेली. प्रेमले, तुझ्याजवळ एखादी माळ आहे का ?

प्रेमला : नाही हो. माझ्याजवळ माळ नाही.

स्वामी : प्रेमले, तुझ्या गळ्यात बघ.

प्रेमला : ते मंगळसूत्र.

स्वामी : चालेल. पवित्र कार्यासाठी मंगळसूत्रसुद्धा जपमाळ म्हणून वापरायला आम्हाला आवडेल.

प्रेमला : अहो, पण मंगळसूत्र कसं काढू ?

स्वामी : आपलं पवित्र नातं स्मर आणि काढ. (ती देते.) आता आम्ही आमच्यातला विराट पुरुष जागा करतो. तू प्रकृती आहेस. तू त्याच्याशी एकरूप होणार

आहेस. देहभान गळून पडणार आहे. कायमची समाधी लागणार आहे. आमच्या हाताला हात लाव. डोळे मीट. आमच्या अंगावर सर्व भार टाक आणि मोकळी हो ! (मंगळसूत्राने जप करतो. ती डोळे मिटते पण हा तिच्याकडे पाहतो.)

प्रभास : (बाहेरच्या खोलीत) भारवाहका, मी तुला बघतो. तुझी हाडं मोकळी करतो. (बाहेर 'भगवान प्रेमानंद महाराज की जय !' असा मोठा घोष होतो.)

स्वामी : अरे अरे अरे अरे ! समाधीचा भंग करणारे काय हे लोक ! (बाहेर पुन: जयजयकार)

स्वामी : प्रिय शिष्ये प्रेमले, बाहेर जाऊन भक्तांची रांग लाव आणि एकेकाला आत दर्शनाला यायला सांग. (प्रेमला बाहेरच्या खोलीत येते. प्रभास लपतो.)

प्रेमला : (दारातून बाहेर पाहते व वळून म्हणते–) भगवान, आपले भक्त आपल्या दर्शनासाठी धडपडत आहेत. काही अमेरिकन आहेत. एक पुढारी आहेत. एक व्यापारी आहेत. एक बाई आहेत. बाकी पुष्कळ आहेत. सगळेच पुढेपुढे करताहेत.

स्वामी : आधी अमेरिकन लोकांना पाठव. किती लांबून येतात बिचारे. बाकीच्यांना रांग लावायला सांग आणि तू मघासारखी मला लागून बैस. (ती तसे करते. दोन अमेरिकन पुरुष व एक अमेरिकन स्त्री येतात.)

१ अमे.: थँक्यू, भगवान. गुड इव्हिनिंग.

स्वामी : नो गुड इव्हिनिंग. नमस्कार ! नमस्कार करा. (स्वामीजी नमस्कार दाखवतात. ते करतात.)

२ अमे.: मिस्टर भगवान, इस्टंट कुंडलिनी वाँटेड.

स्वामी : इस्टंट कुंडलिनी ग्रांटेड. पण आधी फी – सॉरी, दक्षिणा – वाँटेड.

अमे. बाई : हौ मच ?

स्वामी : ऑर्डिनरी कुंडलिनी वन थाउजंड डॉलर्स. स्पेशल कुंडलिनी फाइव्ह थाउजंड डॉलर्स. इंस्टंट स्पेशल डिलक्स कुंडलिनी टेन थाउजंड डॉलर्स ओन्ली.

तिघेही : ओ. के. इंस्टंट स्पेशल डीलक्स कुंडलिनीच पाहिजे. आम्हांला जादा वेळ नाही. ही घ्या दक्षिणा. आज रात्री वीस हजार तरूणतरुणी 'धिंगाणा अँड गाणा बजावणा नाचना' मध्ये भाग घेणार आहेत. तिथे आम्हांला अर्जंट जायचं आहे. म्हणून मोस्ट इंस्टंट कुंडलिनीच पाहिजे.

स्वामी : आम्ही पैशाला शिवत नाही. जगन्माता महामाया प्रेमलादेवींना द्या. शिष्ये

प्रेमले, पैसे घे आणि त्या सूटकेसमध्ये ठेव. मोहात पडू नकोस. ओके. (स्वामी विवेकानंद पोझमध्ये) माय डिअर अमेरिकन ब्रदर्स अँड सिस्टर्स, रेज युवर हँडस्, क्लोज युवर आइज. से, भगवान प्रेमानंद स्वामी महाराजजी की जय ! (ते तसे म्हणतात.) झाली कुंडलिनी जागृती ! कुंडलिनी अवेकंड ! अहाहा ! ती पाहा ! ती पाहा ! ती पाहा !

१ अमे.: भगवान, नो कुंडलिनी. नथिंग.

स्वामी : स्नान – बाथ – केले होते का ?

१ अमे.: गेल्या वर्षी राजस्थानमध्ये पावसात वेट झालो होतो.

स्वामी : देन गेट आउट. नो बाथ. नो कुंडलिनी. नो मोअर. ओन्ली वन्स.

२ अमे.: मायसेल्फ टू. नो कुंडलिनी. नथिंग.

स्वामी : शो मी युवर पाम. (हात पाहतो.) नो कुंडलिनी इन युवर फ्यूचर. सॉरी. गेट आउट.

अमे. बाई : मीटू, मीटू, भगवान, मीटू. नो कुंडलिनी. नथिंग.

स्वामी : कुंडलिनी इज संस्कृत. युवर हेड इज इंग्लिश. नो संस्कृत इन युवर हेड. नो कुंडलिनी. गेट आउट. (तिघे जातात.)

स्वामी : प्रिये शिष्ये प्रेमले, झाली का पृथ्वीप्रदक्षिणेची सोय ? परपुरूषाची कास धर ! पूर्वी सासुरवाशिणी सुना म्हणत, माझिया माहेरा जा ऽ जा रे पाखरा ऽ.... आता मुलींच्या आयाच म्हणत आहेत, मुलींच्या सासरा जा ऽ... मुलींच्या सासरा जा ऽ.... जा रे विमाना ऽऽ

व्यापारी : (येत) जय भगवान प्रेमानंद स्वामीमहाराजजी ! (पाया पडतो. नोटांची पुडकी ठेवतो.)

स्वामी : कल्याणमस्तु ! शेटजी, धंदा सोडून यायला वेळ कसा झाला ?

व्यापारी : दर्शन ! दरशान !

स्वामी : आणखी ?

व्यापारी : प्रसाद ! परशाद !

स्वामी : खोटं बोलू नका. भगवानांचा कोप होईल.

व्यापारी : नको. नको. भगवान ! पाया पडतो. (पुन: पाय धरतो.)

स्वामी : खरं बोला.

व्यापारी : भगवान, धंदा बुडीत चाललाय.

स्वामी : खरं बोला.

व्यापारी : खरं सांगतो. भगवान, फक्त पंचवीस टक्के नफा होतोय. शंभर टक्के झाला पाहिजे.

स्वामी : झाला पाहिजे म्हणजे झालाच पाहिजे.

व्यापारी : कृपा, भगवान. गरिबावर दया करा.

स्वामी : गरिबावर दया करण्यासाठीच आमचा अवतार. शेटजी, तुम्हाला पाहिजे– कुंडलिनी समाधी !

व्यापारी : नको. नको. भगवान. पाया पडतो. आमची लागली समाधी की मिळकत बुडाली समदी. नको. नको. ती तुम्हा मोठ्या लोकांची कामं ! आमची काय लायकी नाय !

स्वामी : कुंडलिनी, शेटजी. तुम्हाला कुंडलिनीच पाहिजे. तुमचा उद्धार कुंडलिनीच करणार. इंस्टंट कुंडलिनी !

व्यापारी : इंस्टंट कुंडलिनी.....इंस्टंट दिवाला.....

प्रभास : इंस्टंट कुंडलिनी ? ही तर स्टंट कुंडलिनी !

स्वामी : कुंडलिनीयोग जीवनव्यापी आहे. इथे कुंडलिनी. तिथे कुंडलिनी. वर कुंडलिनी. खाली कुंडलिनी. शेटजी, नवी ट्यूबलाइट काढा. कुंडलिनी ट्यूबलाइट पाचशे रुपये. इंस्टंट कुंडलिनी ट्यूबलाइट हजार रुपये. इंस्टंट खपेल. पेटली का ट्यूबलाइट ? कुंडलिनी गाइडस् काढा. सर्व विषय पाचशे रुपये. इंस्टंट कुंडलिनी गाइडस् – फक्त मोस्ट इंपॉर्टंट – अगदी थोडक्यात– इन ए नटशेल – टरफलात – हजार रुपये. इंस्टंट खपतील.

व्यापारी : कृपा, भगवान, कृपा ! जय प्रेमानंदस्वामी महाराजजी !

स्वामी : आणखी पाहिजे ?

व्यापारी कृपा, भगवान.

स्वामी : कुंडलिनी सिगारेटस् काढा. अधिक कडक इंस्टंट कुंडलिनी सिगारेटस् ! भक्त लोक चिलीम ओढतातच की नाही ?

व्यापारी : भगवान देता है तो छप्पर फाडके देता है !

स्वामी : छप्पर फाडके नाही. जमीन फाडके. आसमान फाडके.

व्यापारी : कृपा, भगवान, कृपा.

स्वामी : आणखी पाहिजे ?

व्यापारी : कृपा, भगवान, कृपा.

स्वामी : कुंडलिनी दारू काढा. अधिक कडक इंस्टंट कुंडलिनी दारू ! कडक कडक एक्स्ट्रा स्पेशल डीलक्स मोस्ट इंस्टंट स्पेशल डीलक्स कुंडलिनी दारू !

व्यापारी : भगवान, लोक मारतील.

स्वामी : मारतील ! पेगवर पेग मारतील ! भक्त लोक भांग पितातच की नाही ?

प्रभास : भगवान, भंगड ! याच्या सगळ्या भानगडी बाहेर काढतो. हरामखोर. बदमाश.

स्वामी : शेटजी, दारू दुकानांची नावं काय असतात ? योगी ! ऋषी ! मुनी ! तिथं दारू हीच कुंडलिनी ! काढा–दारू दुकान–कुंडलिनी !

व्यापारी : आपण सत्य भगवान ! सगळीकडे कुंडलिनी पसरतो. सगळ्या जगाला समाधी देतो !

प्रभास : कायमचीच समाधी !

स्वामी : पण एक पथ्य पाळा.

व्यापारी : काय ?

स्वामी : हे आम्ही सांगितलंय हे कोणाला सांगू नका. नाहीतर इंस्टंट नष्ट होईल....पण आमचं स्मरण ठेवा.

व्यापारी : निघतो, भगवान.

स्वामी : आमचं स्मरण ठेवा... ठेवा !

व्यापारी : हो..हो.. (नोटांचे एक बंडल ठेवतो.)

स्वामी : आणखी स्मरण ठेवा. (असे दोन तीनदा होते.)

स्वामी : भगवानांचे फोटो सगळीकडे लावा. रोज पूजा करा. जयजयकार करा. भक्तीचा प्रसार करा.

प्रभास : जाहिरातबाजी.

व्यापारी : पण भगवान... काळजी वाटते.

स्वामी : (प्रेमलेकडे पाहत) आमच्या अंगावर आपला सगळा भार टाकून पूर्ण मोकळे व्हा ! जा. इंस्टंट जा.

(बाहेर गलका–भगवान प्रेमानंद स्वामीमहाराजजी की जय.)

स्वामी : प्रिये, शिष्ये, जा. कोण पुढारी आहेत त्यांना घेऊन ये.

प्रेमला : आधी पुढारी की आधी गरीब ?

स्वामी : आधी पुढारी. तो गरिबांचाच पुढारी ना ? (प्रेमला, सूटकेससहित पुढारी. बरोबर फोटोग्राफर येतात.)

पुढारी : भगवान प्रेमानंद स्वामीमहाराजजी की जय ! (आडवा पडतो. फोटो.)

स्वामी : आम्ही  तुमच्यावर प्रसन्न झालो आहोत. आम्ही तुमच्यावर कृपा करणार आहोत. आम्ही तुम्हाला प्रसाद देणार आहोत. (पाय पुढे करून) तुमच्या मस्तकाच्या तळ्यात हे चरणकमळ लावा. (पुढारी पाय डोक्यावर घेतो. फोटो. स्वामी पाय जवळ घेतो. फोटोग्राफर 'वन मोअर' म्हणतो. पुन: डोक्यावर पाय. पुन: फोटो. ) आमचा तुम्हाला आशीर्वाद आहे. यशस्वी व्हा.

पुढारी : भगवान, मी फक्त मुख्यमंत्री. मला पंतप्रधान व्हायचंय.

स्वामी : होणार ! भगवानांच्या भक्तीचा प्रसार करा. हा फोटो सगळ्यांना द्या. एन्लार्ज करून ऑफिसात लावा. रोज पूजा करा.

पुढारी : भगवान, वर्तमानपत्रं रोज आमची पाद्यपूजा करतात. आम्हाला लाखोली वाहतात.

स्वामी : श्रद्धा ! श्रद्धा पाहिजे !

पुढारी : भगवान, आम्ही तुमच्यावर श्रद्धा ठेवतो. पण लोक वर्तमानपत्रांवर श्रद्धा ठेवतात.

स्वामी : वर्तमानपत्रं म्हणजे रद्दी. सत्य आमच्याकडे द्या. आम्ही ते ईश्वरार्पण करू आणि नष्ट करू. (कान पुढे करतो. पुढारी कानाशी लागतो.) गीतेत काय सांगितलंय ? जे जे कराल ते ते कराच फक्त भगवानाला अर्पण करा ! करा. (पुढारी सूटकेसमधून बंडले ठेवतो.) आमच्या अंगावर सर्व भार टाकून (सबंध सूटकेस ठेवून घेतो.) पूर्ण मोकळे व्हा. आम्ही तुमच्यासाठी महायज्ञ करू. त्या यज्ञात तुमची सगळी महापापं नष्ट करू. तेवढी महायज्ञाची महाव्यवस्था करा म्हणजे झालं. (सूटकेसला स्पर्श करून मोठी हवी असे दर्शवितो.) आमच्या पृथ्वीप्रदक्षिणेची तयारी झाली ! जा. यशस्वी व्हा. आमचा आशीर्वाद आहे ! (दोन्ही हातांनी आशीर्वाद. पुढारी डोके वाकवतो. फोटो. पुढारी व फोटोग्राफर जातात.)

स्वामी : प्रिये शिष्ये, आमच्या अंगातील दिव्य शक्तीची प्रचीती तुला आली ना ? (तिच्या मस्तकावरून हात फिरवतो.) आणखी येईल. लवकरच येईल. (बाहेर जयजयकार.)

स्वामी : जा. प्रिये जा. बाहेर कोण तळमळत आहे त्यांना लवकर घेऊन ये. आम्हालाही तळमळत ठेवू नकोस. लवकर ये हां ! भगवान भक्तांचा भुकेला ! (तिला हाताने उठवतो. तिचा हात हळूहळू सोडतो. ती गेल्यावर तिच्याकडे पाहत राहतो.)

प्रभास : तळमळ ? तुझी खरी मळमळ मला कळली. माझं लोणी पळवतोस काय रे, बोक्या ? घी देखा लेकिन बडगा नही देखा. (टेपरेकॉर्डर उंच करतो.) (प्रेमला एका सुंदर स्त्रीस घेऊन येते. स्वामी खूष.)

स्वामी : (प्रेमलेस) प्रिये...शिष्ये, बाहेर शिष्यगण प्रसादासाठी तळमळत आहेत. त्यांच्यासाठी प्रसाद सिद्ध कर. चांगला मिष्ट कर हां ! साखर भरपूर. दूध भरपूर. तूप भरपूर. प्रसाद जिभेवर पडला की कुंडलिनी समाधीच ! तुझा हात गोड आहे. जा. जगन्माते, जगत्पित्याची आज्ञा ऐक. प्रसाद कर. इंस्टंट कर. जा, हां ! (प्रेमला आत जाते.)

प्रभास : हात गोड ! तो काय ऊस आहे काय रे भगव्या ? चोयट्यांनी तोंड कापेल तेव्हा समजेल. प्रसाद वाटतोय. हलवायाच्या घरावर तुळशीपत्र ! हां. ही आणखी एक गोड भानगड !

स्त्री : (येते. नमस्कार करते. बसते. रडू लागते.)

स्वामी : (तिचे डोळे पुशीत, तिच्या पाठीवर हात फिरवीत, तिला जवळ घेत) कशाला रडतेस, बाई ? भगवान देव तुझ्या भेटीला आला आहे !

स्त्री : वंशाला दिवा नाही. मला टाकून देणार आहेत.

स्वामी : आम्ही तुला टाकलंय का ? तुझी इच्छा इंस्टंट पूर्ण होईल, हां !

स्त्री : म्हणजे ?

स्वामी : म्हणजे तू म्हणशील तेव्हा. रडू नको. भगवान भक्तांचा भुकेला. भक्तांची दुःखं दूर करीत भगवान सर्वत्र संचार करतात. तुझं दुःख दूर होईल. तुझा सगळा भार आमच्या अंगावर टाक आणि मोकळी हो ! हां !

प्रेमला : (येत) मी तयार आहे !

स्वामी : मीही तयारच आहे ! (बाईस) तूही तयार आहेसच ना ?

प्रेमला : म्हणजे प्रसाद तयार आहे.

स्वामी : माझा प्रसादही तयारच आहे ! (प्रेमला आतून पातेले आणते.) डोळे मिटा. प्रार्थना करा. म्हणा, भगवान प्रेमानंद स्वामी महाराजजी की जय ! (दोघींनी डोळे मिटल्यावर स्वामी कफनीच्या खिशातून पुडी काढून तिच्यातील पावडर प्रसादावर पेरतो.) डोळे उघडा. तुम्हांला नवी दृष्टी लाभली आहे. आमचा प्रसाद घ्या. (दोघींना प्रसाद भरवतो. बाहेर प्रभास अस्वस्थ.) आता हा शेष बाहेर तळमळणाऱ्या भक्तांना वाटा. त्यांची तळमळ इंस्टंट शांत होईल. कुंडलिनी जागृत होईल. समाधी लागेल ! बाहेर आमचे प्रिय पट्टशिष्य देशभक्त

पुढारी आहेतच. त्यांना म्हणावं, दक्षिणा गोळा करा आणि प्रसाद वाटा. आम्ही सर्वांना इंस्टंट दर्शन देऊन येतो. चला आमच्याबरोबर. (दोघींच्या खांद्यावर हात ठेवून निघतो) सच्चिदानंद ! सच्चिदानंद ! ब्रह्मानंद ! कुंडलिनी जागृत झाली ! मग देहाते कोण सांभाळी ? (तिघे बाहेर जातात.)

प्रभास : माझी हक्काची एक बायको मला मिळत नाही आणि हा बदमाषांचा बादशाहा दोन दोन बायकांना बिघडवतो. लबाडा, (टेपरेकॉर्डर उचलून) हा बघ तुझ्या वचनांचा गाथा. पोलिसातच देतो. मग तुरूंग हाच तुझा आश्रम आणि खडी फोडणे हीच तुझी पार्थिव पूजा. माझं घर म्हणजे काय तुझा रंगमहाल ? आता तुरूंगात तुझे हाल कुत्रा खाणार नाही. मी गृहस्थाश्रमात असून माझा संन्यासाश्रम चाललाय अन् तू संन्याशी म्हणवून गृहस्थाश्रमावर ताण करतो आहेस ! येच. तुला दाखवतोच. बदमाषा, दोघींचं पाणिग्रहण करतोस ? तुला (बेड्या घालण्याचा अभिनय करीत) चतुर्भुजच करतो. तुझ्या बायका आता दंडा आणि बेडी. पोलीस आणि फटके ! (बाहेर जयजयकार. प्रभास लपतो. स्वामी दोघींच्या खांद्यावर हात ठेवून हसतहसत येतो. आतल्या खोलीत जातो. प्रभास बाहेर निघून जातो. स्वामी बायकांबरोबर नाच करतो.)

पुरूषांशी त्या रम्य अती – पुरूष एकच
नित्य प्रकृती क्रीडा करिती – प्रकृती अनेक
स्वरसंगम त्या क्रीडांचा – संगम, संगम
ओळखणे हा ज्ञानाचा – हेच ज्ञान
हेतु तयाची सुंदरता – सुंदरता
व्हाया चित्ताप्रत ती ज्ञाता – चित्तात आनंद
वाडे कोडे गा आता – गा, गा, गा
झपूर्झा गडे झपूर्झा..... झपूर्झा.......झपूर्झा.....
(प्रभास जाऊन पोलीस इन्स्पेक्टरला घेऊन येतो.)

प्रभास : इन्स्पेक्टरसाहेब, हाच तो लबाड भगवान. याच्या सगळ्या बोलण्याची टेप तुम्हाला मी दिलीच आहे. हीच माझी बायको. पण हाच हिला फूस लावतोय. ही आणखी एक बाई बघा. हिला पण तो नादी लावतोय.
(बाहेर 'भगवान प्रेमानंदस्वामी महाराजजी की जय' असा जयजयकार चालू.)

इन्स्पेक्टर : (शिटी फुंकून) लोक हो, शांत राहा. भगवान प्रेमानंदस्वामीमहाराजजी म्हणविणाऱ्या या इसमाविरुद्ध या रावसाहेबांची ठकबाजीची कंप्लेंट आहे.

म्हणून त्यांना पकडून न्यायला मी आलो आहे.
(बाहेर स्वामींचा जयजयकार.)

इन्स्पेक्टर : बायांनो, बाहेर थांबा. रावसाहेब, यांच्यावर लक्ष ठेवा. ठाण्यावर त्यांच्या साक्षी घ्याव्या लागतील. मी आत यांचा झाडा घेतो.

प्रभास : झाडा ?

इन्स्पेक्टर : म्हणजे झडती. असले भगवान कफनीच्या आत पिस्तुलं, बाँबगोळे, विषाच्या, अफूच्या पुड्या..... काय वाटेल ते बाळगतात. याला उघडा करतो आणि फटके मारतो.

प्रभास : याला दिगंबर करणार ?

इन्स्पेक्टर : बरोब्बर. दिगंबर. या बायांना लवकर बाहेर न्या म्हणजे याचं दिगंबर स्वरूप प्रगट करतो. (बाहेर 'भगवान दिगंबर रूपात प्रगट होणार' अशी गर्जना. जयजयकार. लगेच गजर 'दिगंबरा.....दिगंबरा....प्रेमानंदा दिगंबरा.....दिगंबरा.....दिगंबरा....दर्शन द्या हो दया करा.' स्वामी कपडे घट्ट धरतो. प्रभास व बायका बाहेर जातात. स्वामी व इन्स्पेक्टर स्टेजच्या दोन टोकांना. दोघेही भयंकर घाबरलेले. स्वामी दोन्ही खिशांतून नोटांची बंडले काढून हातात घेतो. हळूहळू दोघे एकमेकांकडे वळतात.)

इन्स्पेक्टर : (स्वामीचे पाय धरून) भगवान, माफ करा. माफ करा. आपण साक्षात भगवान. मी आपला सच्चा भक्त. भगवान, मी भाग्यवान. आपला चरणस्पर्श लाभला ! प्रसाद द्या. प्रसाद. नाहीतर मी पाय सोडत नाही.

स्वामी : भक्ता, ऊठ. तुझ्या अंगावरचा सगळा भार आमच्या अंगावर टाक आणि पूर्ण मोकळा हो. पण भल्या भक्ता, भगवंताकडे रिक्त हस्ताने जाऊ नये.

इन्स्पेक्टर : (उठून) नाहीच. ही तुमची टेप तुम्हालाच देऊन टाकतो. मग झालं ? म्हणजे पुरावाच नाही.

स्वामी : शाब्बास ! आदर्श भक्त आहेस.

इन्स्पेक्टर : भगवान, आपणच आमचे आदर्श.

स्वामी : पण प्रिय भक्ता, ही टेप तू आमची आम्हालाच दिलीस. तुझं काय ?

इन्स्पेक्टर : दक्षिणा देतो, भगवान. पण प्रसाद करा.

स्वामी : हव्वे ते माग.

इन्स्पेक्टर : भगवान, आमचे मुख्यमंत्री आपले पट्ट शिष्य. म्हणजे आपण आमच्या बॉसचे बॉस. भगवान, एका वस्तीवर एक कोटीचा दरोडा पडला. दरोडेखोर मीच

पकडले. पण कोटी रुपये काळोखात कुठे तरी पडले. भगवान, मोठी तोहमत आलीय.

स्वामी : चिंता करू नकोस. पैसे कुठे पडले ते आम्हाला अंतर्दृष्टीनं दिसले.

इन्स्पेक्टर : भगवान !

स्वामी : ते पैसे पवित्र करून टाक. भगवानांच्या आश्रमाला देणगी दे.

इन्स्पेक्टर : सगळे ?

स्वामी : भक्ता, सर्वनाशाची वेळ आली म्हणजे शहाणे अर्ध्याचा त्याग करतात ! आम्ही सांगू सगळ्यांना की दरोडेखोरांना काळोखातून आणताना पैसे नाल्यात पडून वाहून गेले !

इन्स्पेक्टर : भगवान, आपल्याला मी जीपमधून नेणार आहे. पण जीप मीच चालवतोय. वाटेत एका पडक्या देवळात मला बांधून ठेवा आणि बायांना घेऊन पळून जा.

स्वामी : असा भक्त हवा. तू भगवानावर म्हणजे सर्व जगावर उपकार करीत आहेस. पण आता मला धरून चल.

इन्स्पेक्टर : भगवान, तेवढं देवाजीला आमच्या नावानं गाऱ्हाणं घाला.

स्वामी : कल्याणमस्तु ! तथास्तु !

(इन्स्पेक्टर शिटी फुंकतो. दार उघडतो.)

इन्स्पेक्टर : बायांनो, सामान उचला. चला.

(दोघी बायका व इन्स्पेक्टर सूटकेसेस उचलतात.)

इन्स्पेक्टर : (मोठ्याने ओरडून) चला, ठाण्यावर. गुरूमहाराज, सगळ्या जगाला प्रसाद देत होता ना ? (दंडूका उगारून) आता खा माझाच प्रसाद ! चमत्कार करता ना ? करा. जा पळून. देवाला बोलावता ना ? दाखवा बोलावून. चला ! (प्रेमानंद घाबरतो !) (प्रभासला) रावसाहेब, आपण तक्रार दिलीच आहेत. आपण घरीच बसा. घर सांभाळा. चांगलं सांभाळा. हे हे असं काय कामाचं ? साक्ष घेऊन बाईंना बघून आणून सोडतो. पुन: असल्या लफड्यात सापडू नका ! (इन्स्पेक्टर, बायका, स्वामी जातात. बाहेर जयजयकार.)

प्रभास : म्हणे घर सांभाळा. घर कसलं ? बायको नसलेलं घर म्हणजे वैराण रान. कसली ही बायको ! असली काय नसली काय सारखीच. आमच्या नशिबातच स्त्रीसुख नाही. आम्ही असेच मरायचे. चार दिवस तारुण्याचे राहिले होते. सगळे वायाच जाणार. खरी बायको नाहीच नाही. नाटकातलीसुद्धा नशिबात नाही !

(मधुराला फरफटत ओढत मधुप येतो.)

मधुप : प्रभ्या, साल्या, घरातल्या घरात खोट्या नाटकापुरती माझी बायको हवी म्हणालास. पण बदमाषा, तिच्या मनात कायमचं घर करून बसलास. माझं घर उजाड केलंस. आता ही बायको तुलाच घेऊन टाक. मला नकोच.

मधुरा : तुम्हाला काय नाटकांत हव्या तेवढ्या मिळतील ! (रडते.)

मधुप : नाटकातल्या खोट्या बायका काय चाटायच्यात ? तू खरी हवी होतीस. पण खोटी निघालीस.

मधुरा : मी खोटी नाही आहे. तुम्हीच खोटे आहात.

मधुप : म्हण, मला खोटा म्हण. म्हातारा म्हण. आळशी म्हण. पडलेला म्हण. बुड्ढा म्हण. आणि या गाढवाला स्मार्ट म्हण, तरुण म्हण, सुंदर म्हण, ते काही नाही. आता इथंच राहा. मरेपर्यंत राहा. मेल्यावरसुद्धा राहा. मी चाललो. बाहेरून कडी घालून कुलूपच ठोकतो. बसा आत अखंड प्रेम करीत. (जातो. दार, कडी, कुलूप लावल्याचा आवाज येतो.)

मधुरा : आता हो काय करायचं ?

प्रभास : पाहत राहायचं !

मधुरा : (मोठ्याने) काय ?

प्रभास : होईल ते !

मधुरा : काय होईल हो ? माझ्याजवळ लाल तिखटाच्या पुड्या आहेत.

प्रभास : तुम्ही मला तोंडी लावणार ?

मधुरा : खाणार !

मधुरा : दोन दोन फोन कशाला आहेत ? नातेवाइकांना बोलवा, शेजाऱ्यांना बोलवा, पोलिसांना बोलवा.

प्रभास : कशाला ? आपल्याला हमतुम एक कमरेमे बंद पाहायला ?

मधुरा : कुलूप फोडायला.

प्रभास : तू जाणार कुठे ? त्यानं घराबाहेर काढलंय ना ?

मधुरा : मित्रमैत्रिणींना सोबत बोलवू. त्यांच्याबरोबर राहू.

प्रभास : माझी बायको म्हणजे आदर्श कारभारीण आहे. दोन फोन. पण बाहेर जाणारे सगळे कॉल्स तिनं बंद केलेत. कोडनंबर तिनं मलासुद्धा सांगितलेला नाही. तिची खात्रीच की फोन मिळाला की तिला चोरून मी एकामागून एक प्रेमप्रकरणं करीत राहणार ! आणि इथं तर चांगले दोन दोन फोन ! एकाच वेळी

दोन दोन प्रियकरणी ! तरीच बरं का मोठ्या उद्योगपतींच्या नि राजकारणी लोकांच्या टेबलावर आठ आठ फोन असतात – रंगीबेरंगी. आता म्हणे फोनमधून सुगंध येणार आहे ! छान ! बोलणारा–चुकलो–बोलणारी समोर प्रत्यक्ष दिसणार आहे ! आपल्याला अनेक बायका दिसतील पण त्यांना मात्र आपण एकटेच दिसू अशी रचना करता येईल.

मधुरा : अहो, टी. व्ही. तरी लावा. बातम्या तरी बघू.

(तो टी. व्ही. लावतो. 'आजच्या ठळक बातम्या. स्वत:ला भगवान प्रेमानंद स्वामी महाराजजी म्हणवून घेणाऱ्या एका निर्ढावलेल्या लफंग्याला, गर्दचा व्यापार करणे आणि बायकांना फूस लावून पळवणे या आरोपांखाली आज पोलीस इन्स्पेक्टरांनी अटक केली. पण इन्स्पेक्टर त्याला जीपमधून पोलीस चौकीवर नेत असताना त्याने इन्स्पेक्टरना गुंगीचे औषध हुंगवले, बेशुद्ध केले आणि जीप थांबवून एका पडक्या देवळात तोंड बांधून खांबाला बांधून ठेवले. नंतर देवाकडे वळण्याऐवजी हा बदमाष बरोबर पळवून आणलेल्या दोन अज्ञात तरुण सुंदर बायकांबरोबर वेगाने जीप हाकीत अज्ञात ठिकाणी गायब झाला. ज्या कोणाला ही पोलीसची जीप दिसेल त्याने जवळच्या पोलीस ठाण्यावर ताबडतोब वर्दी द्यावी.' प्रभास टी. व्ही. बंद करतो.)

मधुरा : अगबाई, काय करणार ? बारा वाजले.

प्रभास : खरोखरच आमचे बारा वाजले !

(इतक्यात दोन्ही फोन एकदम वाजू लागतात. मध्ये कॉन्फरन्स रिसीव्हर स्पीकर आहे. त्यामुळे सर्वांचे बोलणे सर्वांना ऐकू येते. दोघे धावतात व एकेक फोन घेतात.)

प्रभास : हॅलो, कोण छबडी का ? अमेरिकेतून ना ? काय म्हणू ? गुड मॉर्निंग ?

मधुरा : हॅलो, कोण बबडी का ? जपानहून ? गुडइव्हिनिंग ? कोण पाहिजे ? आई ? काय हो, काय सांगू ?

प्रभास : बबडे, आई बाहेर गेलीय. उद्या येईल.

बबडी : आत्ता मध्यरात्री कुठे गेलीय ? आणि बाबा, तुम्ही घरी कसे ?

प्रभास : तुमचे फोन घ्यायला.

बबडी : बाबा, आई ज्यांच्याकडे असेल त्यांचा फोन नंबर द्या. तिला गमतीची गोड बातमी सांगायचीय.

मधुरा : अस्सं ! हूं !

प्रभास : मला सांग ना. मी तिला सांगेन.

बबडी : ऊं हूं. आईलाच. फोन नंबर द्या ना.

प्रभास : फोन नंबर नाही आहे.

बबडी : फोनजवळच सगळ्या नातेवाईकांचे नंबर्स आहेत.

प्रभास : त्यात नाही आहे.

बबडी : आई गेली आहे तरी कुठे ? बोला ना. सांगा ना.

प्रभास : माहीत नाही.

बबडी : (ओरडून) माहीत नाही ?

छबडी : बाबा, मग घरात कोण बाई आहे ?

प्रभास : शेजारच्या आजीबाई.

छबडी : आजीबाई ?

छबडी : आवाज तर तरूण बाईचा येतोय. आवाज चांगला आहे. तयारीचा आहे. कुठंतरी ऐकल्यासारखा वाटतोय.

बबडी : अग छबडे, ती मधुरा नटी नाही का ? अगदी तिच्यासारखा गोड आवाज आहे. आपण प्रवासाला निघण्यापूर्वी सगळ्यांनी मिळून सिनेमा पाहिला नव्हता का ? अग, ती. बाबांच्या मधुप नावाच्या मित्राची बायको.

छबडी : बाबा, खरंच घरात मधुराच आहे का हो ?

बबडी : मध्यरात्री बारा वाजता ?

छबडी : आणि घरात आई नाही ? बाबा, घरात दुसरं कोण आहे ? बोलवा ना फोनवर.

प्रभास : दुसरं कोणी नाही.

छबडी : म्हणजे बाबा, घरात तुम्ही एकटे आणि ही नटी ?

बबडी : बाबा, सिनेमा पाहून घरी येतानाच तुम्ही सारखे म्हणत होतात...'काय धाडसी नटी आहे !'....

छबडी : 'या शतकाच्या पुढील नटी आहे !'.....

बबडी : 'या मधुरेच्या आवाजात मदिरा आहे !....

छबडी : 'काय फर्मास प्रेम रंगवते !....

मधुरा : छान. चांगली शेरेमारी केलीत. मला मारून टाकलंत (रडते.)

बबडी : मधुरेचाच आवाज हा.

छबडी : मधुरेचाच. बाबा, काय प्रकार आहे ?

प्रभास : पोरींनो, प्रकारबिकार काही नाही. जरा घोटाळा झाला आहे. लवकरच खुलासा होईल.

बबडी : बाबा, आई कुठाय याचा तुम्हाला पत्ता नाही. तुम्ही एकांतात. नटीच्या सहवासात. अन् जरासा घोटाळा म्हणता ?

छबडी : कुठं गेली असेल आमची आई ?

बबडी : मध्यरात्री एकांतात घरात नटी पाहून तिनं जीव तर दिला नसेल ? (रडते.)

छबडी : बाबा, बोला ना, काय झालं आमच्या आईचं ?

बबडी : बाबा, मिळेल त्या फ्लाइटनं मी इंडियाला निघाले.

छबडी : बाबा, मीपण मिळेल त्या फ्लाइटनं निघालेच.

प्रभास : मुलींनो, येऊ नका. आत्ता भलता खर्च करू नका. सगळी शिल्लक संपेल. आपण सगळेच कफल्लक होऊ. जरा धीर धरा. जरा विश्वास ठेवा. आत्ता येऊ नका. काही होणार नाही.

बबडी : आम्ही येईपर्यंत काय व्हायचं राहणार आहे ?

छबडी : आता काय व्हायचं राह्यलंय ? आई उगीच न सांगता घर सोडून गेलीय का ? बिचारी आई.... आई आले ऽ.....

बबडी : आई ऽ.....आई ऽ....आले ग ऽऽऽ निघाले ग ऽऽऽऽ
(दोन्ही फोन बंद होतात.)

मधुरा : चांगली शोभा केलीत माझी ! जगभर माझी टवाळकी केलीत. अगदी जगाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत. जय पैपाराझ्झी ! उद्या जगभराच्या पेपरांत फोटो झळकणार, गॉसिप कॉलम येणार.... मधुरा... धाडसी नटी....शतकाच्या पुढची नटी. मदिरेच्या आवाजाची नटी....प्रेमप्रकरणं फर्मास रंगविणारी नटी.....मध्यरात्री परक्या पुरूषाच्या घरात एकटी राहणारी नटी... सार्थक झालं जन्माचं. आता हिंदुस्थानात तर तोंड दाखवायलाच नको. पण जगात तरी कुठं जाणार ? पॅसिफिक नाहीतर अटलांटिक महासागरात जाऊनच जीव देते झालं. हिंदी महासागर जीव द्यायलासुद्धा मला जवळ करणार नाही.

प्रभास : कुलूप उघडल्यावरच ना ?
(इतक्यात कुलूप उघडते. मधुप प्रेमलेला आत जाण्याचा इशारा करतो.)

प्रभास : तांबडं फुटण्याची वेळ झाली. रात्रभर तू याच्या घरी ? छान ! त्या लफंग्या भगवानानं काम झाल्यावर टाकून दिलं वाटतं ?

प्रेमला : माझ्यावर तोंड टाकू नका. आधी हिला बघते. मग तुम्हाला पुरेपूर बघते. येच.

मधुरा : आधी तुलाच दाखवते. मग (मधुपकडे बघून) त्यांना सावकाश सगळं दाखवते.

प्रेमला : सटवेनटवे, चांगली रात्र रंगवलीस ना ? थांब. तुझं थोबाडच रंगवते. खुश्शाल माझ्या घरात येऊन माझ्या पुढ्यात माझ्या नवऱ्याशी सिनेमा करायला लागलीस ! पुढ्यात एवढं तर मागे काय काय केलं असेल ग बाई !

मधुरा : त्या लफंग्या भगवानाच्या गळ्यात कोण पडलं ? मी की तू ? स्वामी काय, महाराज काय, भगवान काय ! चरणस्पर्श ! करस्पर्श ! अंगस्पर्श ! कृपादान! प्रसाददान ! प्रेमदान ! तो प्रेमभिकारी भगवान अन् ही प्रेमप्रसाद वाटणारी भटकभवानी ! गावभर भटकूनच आलीस ना ?

(बायकांची झोंबाझोबी)

प्रेमला : मी भटकभवानी ? तू तर चटकचांदणी !

मधुरा : भटकभवानी !

प्रेमला : चटकचांदणी !

मधुरा : आई ग, दात पडला माझा.

प्रेमला : छान झालं ! माझ्यावर धरला होतास ना ?

मधुरा : थांब तुझी बत्तीशीच पाडते.

प्रेमला : तुझी पस्तिशी उतू चाललीय ना ?

मधुरा : माझं वय काढतेस ? तुझंच वय झालंय. मी अजून तरुण आहे.

प्रेमला : तू जून आहेस.

मधुरा : तू जुनेरं आहेस.

प्रेमला : सगळ्या जगाला प्रेमाचे वस्तुपाठ देतीय अन् मला खोटी नावं ठेवतीय ?

मधुरा : मंगळसूत्र कुठंय तुझं ? टाकूनच दिलंस ना ? तुझी सूत्रं, तुझ्या नाड्या त्या लफंग्याच्याच हातांत ना ?

मधुप : प्रभ्या ऽ साल्या ऽ हे सगळं तुझ्यामुळं. नाटकाचं नुसतं नाव. घरचं खाऊन समाधान नाही. तुला बाहेरचं चमचमीत खाणं खायचं होतं आधाशीपणानं. म्हणूनच तुझी बायको भगवानाकडे गेली.

प्रभास : अन तुझी बायको तर एकदम सिनेमातच गेली. तुला कुठं तिची हौस भागवता येतेय ?

मधुप : जगात नट्या कमी होत्या का रे तुझी विकृत भूक भागवायला ? माझ्या भोळ्या बायकोला भलत्या मार्गाला नेलंस !

प्रभास : करूनसवरून नामानिराळा. आपल्या बायकोला माझ्या खोलीत रात्रभर बंद करतो. माझ्या बायकोला आपल्या खोलीत रात्रभर ठेवून घेतो ! आणि माझ्या

शुद्ध चारित्र्यावर शिंतोडे उडवतो !

मधुप : तुझं चारित्र्य शुद्ध ? योगीच की नाही तू ? भोगुनी असंख्यात नारी हा म्हणे मी ब्रह्मचारी ! तूच माझ्या सुखी संसारात विष कालवलंस. तुझं हे शृंगारानं पेटलेलं सगळं अंग काळंनिळं पडेपर्यंत तुला ठोकल्याशिवाय मी राहतच नाही.

प्रभास : ये. तुझे हातपायच काय, तुझं सगळंच काढून तुझ्या हातांतच देतो. (मारामारी.)

(इतक्यात एक अधिकारी येऊन पिस्तूल उगारतो.)

अधिकारी : सावधान ! अटेन्शन ! खबरदार ! हलाल तर प्राणाला मुकाल ! हात वर. हलू नका. (बायकांना ) तुम्हीसुद्धा. भांडताना नाही लाज वाटत ? बोलू नका.
(‘हलू नका’ म्हटले की सर्वजण भीतीने हलतात, कापतात. ‘बोलू नका’ म्हटले की सर्वजण भीतीने ओरडतात. अधिकारी दोन बाजूंना दोन गोळ्या झाडतो. प्रभास व मधुप पडतात. त्यांच्या छात्यांवर डोकी ठेवून प्रेमला व मधुरा रडतात.)

अधिकारी : उठा, त्यांच्या अंगांवरचे डाग तुमच्या कुंकवांचे आहेत. तुमचं त्यांच्यावर प्रेम आहे, हे कळलं. चांगलं झालं. जगभर लोकांना गर्दचा प्रसाद देऊन त्या धुंदीलाच कुंडलिनी म्हणणारा आणि तरुण सुंदर बायकांना वाईट मार्गाला लावणारा एक लफंगा भगवान काल दोन बायकांना घेऊन आणि चोरलेल्या पैशांच्या आणि लुबाडलेल्या दागिन्यांच्या बॅगा घेऊन विमानानं परदेशात पळून चालला होता. काही प्रांतिक पोलीस अधिकारीसुद्धा अंधश्रद्धेमुळं त्याला भगवान मानीत होते. मी केंद्र सरकारचा गुप्त अधिकारी. हे माझं ओळखपत्र. आंतरराष्ट्रीय गर्दच्या व्यापाराचा तपास करणं हे माझं काम. तपास करताकरता मी इथपर्यंत पोचलो. आणि योगायोगानं या आणि दुसऱ्या एका बाईंची सुटका झाली. या बाईंनी जवळ ओळखीचं घर आहे असं सांगितलं म्हणून यांना आम्ही यांच्याकडे सोडलं. त्या लफंग्याच्या सामानात ही टेप मिळाली. हे मंगळसूत्रही मिळालं. सोनारांकडे चौकशी करता त्यांनी हा पत्ता दिला म्हणून इथं आलो. आता ही गुन्हेगारी मोडायला सर्वांनी मला मदत करा. एकच सांगतो. ऐका. कळतनकळत या अट्टल गुन्हेगारांना आपल्यासारखे घरंदाज लोकच मदत करीत असतात. आपापल्या संसारांत सुखी राहा. संसारसुख भरपूर घ्या आणि द्या. उपाशीपोटी माणसं गुन्हेगार

बनतात. संसारसुखाचंही तसंच आहे. आपल्या संस्कृतीत संसार शृंगारानेच साजरा करायला सांगितलेलं आहे. देव अर्धनारीनटेश्वरच आहे ! प्रत्येक मंदिर पाहा. वर कामशिल्पं आहेतच. संन्यास शेवटी ! संसार सुफळ संपूर्ण झाल्यावर ! जास्त उपदेशाचे डोस पाजायला मी काही भगवान प्रेमानंद स्वामी महाराजजी नव्हे ! हात खाली. बसा आणि हसा !

प्रेमला : साहेब, मी बसते आणि हसते. पण आधी मुलींना फोन करते आणि त्यांचे हालहवाल विचारते.

प्रभास : त्या हवेत असणार. हिंदुस्थानच्या वाटेवर.

प्रेमला : कशाला ?

प्रभास : तुला शोधायला .

प्रेमला : मग लवकर चला. खात्री करू या. चला. चला. चला.

प्रभास : (अधिकाऱ्याकडे पाहत हलत नाही.)

अधिकारी : अहो, जा. मी अधिकारी केंद्रात. घरात अधिकारी पत्नीच. (दोघे आत जाऊन कॉन्फरन्स फोन बंद ठेवून फोन करतात. काहीक्षण स्तब्ध शांतता. नंतर दोघे हसत बाहेर येतात.)

प्रेमला : पुरूषांना काही कळत नाही. मुली हवेत नव्हत्या. इथे फोन केल्यावर त्या विमानतळावर निघाल्या पण इस्पितळांत पोचल्या. दोघीही एकाच वेळी बाळंत झाल्या आणि दोघींनाही जुळ्या मुलीच झाल्या.

सर्वजण : अभिनंदन ! अभिनंदन ! जुळं अभिनंदन ! जुळं अभिनंदन !

मधुरा : स्त्रीशक्तीचा विजय असो !

प्रेमला : (मधुरेस) तुला होऊ देत म्हणजे समजेल.

मधुप : आहे. शक्यता आहे. (सर्वजण 'अभिनंदन' करतात.)

अधिकारी : या जुळ्या नातींच्या जुळ्या जोडींना भेटायला तुम्ही जाणार ना ?

प्रभास : जाणार–कल्पना एअरलाइन्सच्या विमानानं. फास्टेस्ट एअरलाइन्स !

अधिकारी : तुम्ही ही कॅसेट करून भारत सरकारला गर्दचा गुंड पकडण्यात फार मोठी मदत केली आहे. शंभर टक्के पुरावा. शिवाय तुमच्या मुलींनी आणि जावयांनी विलायतेत उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. त्यांचे पालक म्हणून त्यांच्या भेटीला जाण्यासाठी मी तुम्हा दोघांना प्रवासखर्च देत आहे. पण बाई, पुनः बुवा भगवानाबरोबर जाऊ नका.

प्रेमला : पण साहेब, आता या नातींसमोर यांनी सांस्कृतिक आदर्शाचा पुतळाच उभा

केला पाहिजे की नाही हो ?

अधिकारी : सांस्कृतिक आदर्श आणि संसारसौख्य यांत विरोध आहेच कुठं ? संसारसौख्य लुटल्यानेच संसार सुखाचे होतात. नाहीतर खेळखंडोबा होतो जसा इथं झाला. हाच खेळ सर्वांना दाखवा. चला. वैदिक प्रार्थना म्हणू या.

(सर्वजण अगस्तीलोपामुद्रा संवाद म्हणतात.)

पडदा पडतो.

# मुरलीधर जावडेकर साहित्यकला प्रतिष्ठान


अ *काव्य*
१ नव्या युगाच्या कविता
२ 'नवरा नको ग बाई' आणि इतर पथनाट्ये
ष्ट *कथा*
३ 'नको हे पुरुषी मन' आणि इतर लघुकथा
४ शुभ मंगल ! विज्ञान !! (विज्ञान कथा)
५ 'अवतार' आणि इतर कथा
पै *नाटक*
६ मस्तानीचा बाजीराव
७ सत्तेचा विजय असो !
८ प्रीती मिळेल का हो?
९ गजराज आणि वनराज
१० आग लागो या सगळ्याला
११ चल ये, चल ये, चल ये, बयेऽ
१२ 'निम्मी माझी, निम्मी तुझी' आणि इतर एकांकिका
लू *पटकथा*
१३ स्वातंत्र्यवीर
सा *कादंबरी*
१४ त्सुनामीची सुवर्णसंधी
१५ किलर इन्स्टिंक्ट
१६ अंतिम सत्य
हि *विज्ञान*
१७ विज्ञानाचा कल्पतरू
त्यि *समीक्षा*
१८ साहित्यातील प्रीती आणि भक्ती
१९ महाराष्ट्रातील वैज्ञानिक क्रांती
२० केशवसुत : वैदिक संस्कृतीचा आधुनिक उद्गाता
२१ केशवसुत गातचि बसले !
२२ वैज्ञानिक समीक्षा
क *संकीर्ण*
२३ हिंदू समाजाचा छेदाभ्यास
२४ इंग्रजीत नापास ? अशक्य !!!
२५ To Be, or Not To Be

# प्रतिभेचा स्तिमित करणारा साक्षात्कार
## ~ मुरलीधर जावडेकर यांची कला ~

| | |
|---|---|
| १. कथाकथन | १५ ऑगस्ट १९९९ रोजी स्वातंत्र्यदिनानिमित्त अमेरिकेत कथासंग्रहप्रकाशन आणि कथाकथन केले. महाराष्ट्रात अनेक प्रयोग केले. श्रोते चकित, आनंदित, प्रभावित होतात. कितीही वर्षे जावोत पुन: भेटले की कथांची आठवण काढतात. आजचे आघाडीचे कथाकार. |
| २. नाट्यवाचन | 'मस्तानीचा बाजीराव' या स्वत:च्या नाटकाचे वाचन थोरल्या बाजीरावांच्या तीनशेव्या जन्मदिनी पुण्यात केले. त्यानंतर दूरदर्शन (सह्याद्री) ने मुलाखत घेतली आणि नाट्यवाचनाचे वर्णन 'मंत्रमुग्ध करणारे' असे करून ती प्रसृत केली. डॉ. वि. भा. देशपांडे आदींना आवडलेली संहिता आणि नाट्यवाचन. |
| ३. काव्यप्रस्तुती | साहित्यसंमेलनाध्यक्ष कविवर्य श्री. नारायण सुर्वे, गंगाधर महांबरे, संगीता जोशी इत्यादींना आवडलेल्या कविता. काव्यसंग्रहप्रकाशन आणि 'काव्याचे नाट्यपूर्ण बहारदार सादरीकरण' केले. |
| ४. एकपात्री नाट्यप्रयोग | 'स्वातंत्र्यवीर' (वि.दा.सावरकर) हा (सावरकरांच्या ६ ध्वनिमुद्रित पदांसह) प्रयोग अत्यंत प्रभावी होतो. स्वर्गीय सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, स्वा. सावरकर संमेलनाध्यक्ष वा. ना. उत्पात आदींनी दाद दिली. प्रेक्षकांना सावरकर भेटल्याचा परमानंद होतो. पुण्याच्या 'सांस्कृतिक वार्तापत्र' संस्थेने याबद्दल सत्कार केला. |
| ५. व्याख्यान, मुलाखत इत्यादी | धर्म, विज्ञान, संस्कृती, वाङ्मय इत्यादी विषयांवर महाराष्ट्रातच नव्हे तर अन्य प्रांतांतही अनेक व्याख्याने झाली. दूरदर्शन आणि आकाशवाणी यांनी अनेक मुलाखती घेऊन पुन: पुन: प्रसारित केल्या. |


**डॉ. मुरलीधर जावडेकर,**
**जन्म :** २० मे १९३६ **शिक्षण :** एम.ए.(पुणे), पीएच.डी.(मुंबई)
**व्यवसाय :** मराठी, इंग्रजी प्राध्यापक, प्राचार्य
**पत्ता :** म्हाडा उच्च उत्पन्न गट वसाहत, इमारत क्र. १, गाळा क्र. ९,
संत तुकाराम नगर, पिंपरी, पुणे - ४११०१८. (महाराष्ट्र राज्य-भारत)
**दूरध्वनी :** ०२०-२७४२१६८३ **मोबाईल :** ९८९०१६९१५६

चल ये, चल ये, चल ये बये हे नाटक कसं वाटलं? मराठी साहित्यात नाटक हा प्रकार भारतात सर्वोत्तम मानला जातो. विजय तेंडुलकरांसारख्या नाटककाराच्या नाटकांची भाषातरं सर्व भाषांत झाली. अनेक हिंदी, बंगाली गुजराती नाटकं मराठी नाटकांचे अनुवाद आहेत. संगीत नाटक हा तर मराठी नाटकांचा सुवर्ण काळ. संगीत नाटकांमुळे झालं असं की पहिला सिनेमा जेव्हा मराठी भाषेत झाला तेव्हा त्यात गाणी आली. आणि नंतर भारतीय सिनेमा म्हणजे गाणी हे पक्कं समिकरण झालं. जगात संगीतमय सिनेमा फ़क्त भारतातच बनतो. आणि त्याचं कारण मूळ मराठी संगीत नाटकांत आहे.

पण काय ही आज मराठीची दूरवस्था! आज महाराष्ट्रात दोन मराठी माणसेसुद्धा एकमेकांशी मराठीत बोलत नाहीत. महाराष्ट्रात दुकानांवर मराठी बोर्ड असावेत म्हणून "खळळ खट्टाक" करावे लागते. मराठी कवी लेखकांची मुलं इंग्रजी माध्यमात शिकतात. मराठी शाळा ओस आणि बंद पडत आहेत. पुस्तकांचं वाचन करायच्या वयात मुलं पाण्यासाठी वणवण करताहेत.

अशा वेळी मराठीचा डंका महाराष्ट्रात नव्हे, भारतात नव्हे तर जगभरात गजबजेल अशी स्वप्नं आम्ही पहातो. आमच्यासारखे अनेक लोक पहातात. २३०० वर्षांचा इतिहास असलेल्या या अमृतवाणी मराठी साहित्याचं सुवर्णयुग येईल अशी खात्री आम्ही बाळगतो. कारण मराठीत समृद्ध साहित्य आहे. कारण मराठी माणसांकडे बुद्धीमत्ता आहे. कारण मराठी माणसांकडे प्रतिभा आहे. कारण मराठी नवीन साहित्यिक आणि नवीन वाचकवर्ग उभा होताना आम्ही पहातो आहोत. बारा कोटी मराठी माणसांच्या या भाषेला अमरत्त्व आहेच आहे याची आम्हाला शंभर टक्के

खात्री आहे. म्हणून आम्ही  बारा लाख मराठी लेखक वाचकांचं नेटवर्क उभं करण्यासाठी आम्ही झटत असतो. दर आठवड्याला नवनवीन ई पुस्तकं दीड लाख लोकांना विनामूल्य पाठवत असतो.

हा यज्ञ दिवसेंदिवस मोठे रूप घेतो आहे. आणि त्यात हजारो हातांचं योगदान येत आहे. नवीन लेखक पुढे येत आहेत. हजारो लोक, रोज, कुणी आठ, कुणी दहा, कुणी शंभर, मेल आय डींचं योगदान देत आहेत. तुम्हीही तुमच्या ओळखीच्या शक्य तेवढ्या मराठी लोकांचे ई मेल आय डी आम्हाला पाठवा. त्यांना दर आठवड्याला विनामूल्य ई पुस्तकं पाठवली जातील. मराठी माणूस भले पैशात मागे असेल, पण वाचनात इतर लोकांपेक्षा नक्की पुढे आहे. आणि आज ना उद्या ही गोगल गाय वाटणारी भाषा ढाण्या वाघाचं स्वरूप धारण करील. करीलच!

सर्वांची साथ हवी यार! कृपया आपल्या किमान आठ आप्त मित्रांच्या मेल आय डी esahity@gmail.com  या पत्त्यावर कळवा आणि या महायज्ञात सामिल करा. त्यांना आम्ही नवनवीन मराठी पुस्तकं विनामूल्य पाठवू.



डॉ. मुरलीधर जावडेकर

यच्चयावत् प्राणिमात्रांत आणि मनुष्यांत एकच समान प्रबळ प्रेरणा आहे- भिन्न लिंगी आकर्षण ! पण याचा अर्थ असा नव्हे की मनुष्यसुद्धा एक सामान्य प्राणीच आहे ! मनुष्य प्राणी आहे - पण सर्वश्रेष्ठ प्राणी आहे ! नित्य नवी संस्कृती निर्माण करणारा प्राणी आहे ! म्हणूनच या आकर्षणाचे स्वरूपही मनुष्यात अत्यंत सुंदर रीतीने प्रगट होते. मानवाच्या या मूलभूत सृजनशक्तीचा सुयोग्य आविष्कार ही एक नैसर्गिक गोष्ट जशी आहे तशीच संस्कृतिसंपन्न गोष्टही आहे. अनेक व्यक्तींच्या मनांत या आकर्षणाविषयी अपराधीपणाची भावना असते. ती पूर्णपणे निराधार असते. भावनेच्या दडपण्याने विकृती उत्पन्न होतात. सुयोग्य आविष्काराने सुकृती उत्पन्न होतात. म्हणूनच मानवी संस्कृतीच्या ज्ञात ऐतिहासिक कालापासून हेच आवाहन करण्यात येत आहे की, चल ये, चल ये, चल ये, सखे !

असे हे सुंदर विनोदी संगीत नाटक !!!